दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...


## आजचे पंचांग

सोमवार दि. १६ फेब्रुवारी २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२७, शालिवाहन शक १९४७, विक्रम संवत २०८२, विश्वावसुनाम संवत्सर, उत्तरायण शिशिर ऋतु, माघ मास, कृष्णपक्ष, चतुर्दशी संध्याकाळी ५-३५ पर्यंत नंतर तिथी अमावास्या
दिवस नक्षत्र– श्रवण रात्री ८-४८ पर्यंत
योग– वरीयान् रात्री १-५० पर्यंत

## पालिकेचे वॉर्ड बदलणार!

**पुणे** : महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावानंतर पहिल्यांदाच महापालिका निवडणूक झाली आहे. त्यामुळे, या गावांसह प्रभाग रचना करण्यात आली होती. परिणामी आता महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दी पुन्हा बदलणार आहेत. त्यासाठीची प्रक्रिया महापालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाने सुरू केली आहे. महापालिका निवडणुका ४१ प्रभागांमध्ये झाल्या असून, लोकसंख्येच्या निकषावर ही प्रभाग रचना करण्यात आली आहे.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | सोमवार, दि. १६ फेब्रुवारी, २०२६ | वर्ष - १ | अंक - १४४ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### सिंचनासाठी ३५८ कोटींची तरतूद

**भुवनेश्वर :** ओडिशा मंत्रिमंडळाने शनिवारी एकात्मिक आनंदपूर बॅरेज प्रकल्प अंतर्गत पाणी वितरणासाठी ३५८ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या तीन निविदांना मंजुरी दिली, ज्याचा उद्देश बालासोर आणि केओंझार जिल्ह्यातील सुमारे १५,७६५ हेक्टर शेती जमिनीला सिंचन प्रदान करणे आहे. मुख्यमंत्री मोहन चरण माझी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत या निविदांना मंजुरी देण्यात आली. पाणी वितरणासाठी १०५ कोटी, १०७ कोटी आणि १४६ कोटी रुपयांच्या तीन स्वतंत्र निविदा आहेत.

### बहुमजली इमारतीला कोलकातात आग

**कोलकाता :** दक्षिण कोलकात्यातील हरिदेवपूर भागात रविवारी एका बहुमजली इमारतीत आग लागली, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. सकाळी १०.४० वाजता अपार्टमेंट कॉम्प्लेक्समध्ये लागलेली आग दुपारपर्यंत पाच अग्निशमन दलाच्या गाड्यांनी आटोक्यात आणली, असे त्यांनी सांगितले. यात कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. आपत्ती व्यवस्थापन आणि नागरी आपत्कालीन सेवा कर्मचारी देखील घटनास्थळी पोहोचले आणि आग लगतच्या फ्लॅटमध्ये पसरू नये म्हणून पावले उचलली.

### पुरस्कार विजेत्या शेतकऱ्याची आत्महत्या

**कन्नूर (केरळ) :** या जिल्ह्यातील चेरुपुझा येथे वाढत्या आर्थिक कर्जामुळे एका ६२ वर्षीय पुरस्कार विजेत्या शेतकऱ्याने आत्महत्या केल्याचे पोलिसांनी सांगितले. मृत व्यक्तीचे नाव अंबट्टू इलियास असे आहे, तो चेरुपुझा येथील इदावरम येथील रहिवासी होता. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, त्याने कथितपणे कीटकनाशक सेवन केले होते आणि तीन दिवसांपूर्वी तो त्याच्या शेतात गंभीर अवस्थेत आढळला होता.

### टिपू सुलतान विधानाचा वाद चिघळला, आंदोलन आणि दगडफेकही

# काँग्रेस-भाजप कार्यकर्ते भिडले...

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** छत्रपती शिवाजी महाराज आणि टिपू सुलतान यांच्या संदर्भातील विधानावरून राज्यात राजकीय वातावरण तापले असून, पुण्यात भाजप आणि काँग्रेस कार्यकर्ते आमनेसामने आल्याची घटना घडली. आंदोलनादरम्यान दगडफेक झाल्याचा आणि महिला कार्यकर्त्यांची डोकी फोडल्याचा आरोप काँग्रेसकडून करण्यात आला आहे.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि टिपू सुलतान यांची तुलना केल्याच्या वक्तव्यावरून वाद निर्माण झाला. त्यांच्या या विधानाचा निषेध करत भाजप कार्यकर्ते रस्त्यावर उतरले.

दरम्यान, या प्रकरणी पोलिसांकडून परिस्थिती नियंत्रणात आणण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. पुणे येथे काँग्रेस भवनासमोर भाजपकडून निषेध आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाला उत्तर देण्यासाठी काँग्रेस कार्यकर्तेही मोठ्या संख्येने उपस्थित होते. आक्रमक झालेल्या काही आंदोलनकर्त्यांनी काँग्रेस कार्यालयात घुसण्याचा प्रयत्न केल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे दोन्ही गटांमध्ये जोरदार धक्काबुक्की झाली. या वेळी दगडफेकही झाली. यात काँग्रेसच्या महिला कार्यकर्त्या जखमी झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. काँग्रेस नेते प्रशांत जगताप यांनी आरोप केला की महापौर मंजुषा नागपुरे यांच्या उपस्थितीत काँग्रेस कार्यालयावर हल्ला झाला. महिला कार्यकर्त्यांची डोकी फोडण्यात आली असून पोलिसांनी बघ्याची भूमिका घेतली, असा दावा त्यांनी केला. दुपारी सुमारे १२ वाजता आंदोलनाला सुरुवात झाली. काही मिनिटांत शेकडो भाजप कार्यकर्ते काँग्रेस भवनासमोर जमले. सुरुवातीला सपकाळ यांच्या वक्तव्याचा निषेध व्यक्त करण्यात आला. त्यानंतर काही कार्यकर्त्यांनी काँग्रेस भवनात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. मोठ्या पोलिस बंदोबस्तामुळे त्यांना आत शिरता आले नाही. काँग्रेस कार्यकर्तेही आक्रमक झाले आणि दोन्ही गट समोरासमोर आले. घोषणाबाजी, ढकलाढकली आणि झटापट यामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. सुमारे तासभर हा गोंधळ सुरू होता. आंदोलनादरम्यान काही जणांकडून दगडफेक झाल्याचा आरोप करण्यात आला. काँग्रेस नेते मोहन जोशी आणि प्रशांत जगताप यांनी भाजपच्या आंदोलनाचा निषेध केला. त्यांनी दगडफेक आणि आक्रमक वर्तनाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली.

छत्रपती शिवराय यांनी मुघलांच्या विरोधात लढाई करून स्वराज्याची निर्मिती केली. दुसरीकडे हजारो हिंदूंची कत्तल करणारा टिपू सुलतान आहे. यांना एकसमान आदर दिला जावा अशी काँग्रेसची मागणी असेल, तर मतांच्या लांगूल चालनासाठी कितीही बूट चाटले तरी अशा गोष्टी सहन करून घेणार नाही, असा पलटवार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला.

## हर्षवर्धन सपकाळ माफी मागा; मनसेची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतान यांची तुलना छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी केल्याच्या वक्तव्यावरून निर्माण झालेला वाद अधिकच तीव्र झाला आहे. विविध पक्षांकडून सपकाळ यांच्यावर टीका होत असून मनसेनेही तीव्र शब्दांत निषेध नोंदवला आहे. मनसेने म्हटले की, आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांची टिपू सुलतानाशी तुलना करणे ही निंदनीय बाब आहे. सपकाळ यांनी महाराष्ट्राची आणि शिवप्रेमींची जाहीर माफी मागावी, अशी मागणी मनसेकडून करण्यात आली आहे.

मालेगाव महापालिकेतील उपमहापौरांच्या दालनात टिपू सुलतान यांचा फोटो लावण्यात आला होता. हिंदुत्ववादी संघटनांनी आक्षेप घेतल्यानंतर तो हटवण्यात आला. त्यानंतर या वादावर प्रतिक्रिया देताना सपकाळ यांनी टिपू सुलतान यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या समकक्ष पाहिले पाहिजे, असे मत व्यक्त केले. शिवाजी महाराजांनी जसा शौर्य आणि स्वराज्याचा विचार दिला, त्याच धर्तीवर टिपू सुलतान यांनी कार्य केले, असे त्यांनी म्हटले होते. या विधानानंतर नव्या वादाला तोंड फुटले. भाजप आणि शिवसेनेनेही सपकाळ यांच्या वक्तव्यावर तीव्र टीका केली. या प्रकरणी पुण्यातील पर्वती पोलीस ठाण्यात सपकाळ यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, सपकाळ यांनी आपल्या वक्तव्याची मोडतोड झाल्याचा आरोप केला आहे. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर अप्रत्यक्ष टीका करत दंगली घडवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला.

## अहिल्यानगरमध्ये काँग्रेस विरोधात भाजप आक्रमक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अहिल्यानगर :** काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या वक्तव्याविरोधात भारतीय जनता पक्षाने आक्रमक भूमिका घेतली असून अहिल्यानगरमध्ये निषेध आंदोलन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांची तुलना टीपू सुलतान यांच्याशी केल्याच्या वक्तव्यामुळे भावना दुखावल्याचा आरोप भाजपकडून करण्यात आला. अहिल्यानगर येथे छत्रपती शिवाजी महाराज स्मारकासमोर सपकाळ यांच्या प्रतिमेला जोडे मारो आंदोलन करण्यात आले. या वेळी भाजपच्या वतीने सपकाळ यांची जीभ छाटणाऱ्यास दहा लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आल्याची घोषणा करण्यात आली.

भाजप नेते अनिल मोहिते आणि बाबासाहेब सानप यांनी ही घोषणा केली. सपकाळ यांनी तातडीने राजीनामा द्यावा, अशी मागणीही त्यांनी केली. मतांच्या राजकारणासाठी अशी विधाने केली जात असल्याचा आरोप करत काँग्रेसकडून वेगळ्या अपेक्षा ठेवणे व्यर्थ असल्याची टीकाही करण्यात आली.

संपूर्ण राज्यात सपकाळ यांच्या वक्तव्याचे पडसाद उमटत असून विविध ठिकाणी भाजपकडून आंदोलने केली जात आहेत. नाशिक येथे काँग्रेस समितीच्या कार्यालयाबाहेर निषेध आंदोलन करण्यात आले. या वेळी सपकाळ यांचा पुतळा जाळण्यात आला आणि राजीनाम्याची मागणी करण्यात आली. आमदार देवयानी फरांदे आणि शहराध्यक्ष सुनील केदार आंदोलनात सहभागी झाले होते.

### अजित पवारांचा राजकीय वारसा जपण्यासाठी हालचालींना वेग

# 'दादांची सावली' सुनेत्रा पवार: नवी मोहीम

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पुणे :** माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये तसेच पवार कुटुंबात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. अजित पवारांचा राजकीय वारसा जपण्यासाठी हालचाली सुरू झाल्याची माहिती समोर येत आहे.

विधानसभा निवडणुकीत पक्षाला यश मिळवून देण्यात भूमिका बजावणारे राजकीय रणनीतीकार नरेश अरोरा यांनी 'दादांची सावली' या नावाने नव्या मोहिमेचा आराखडा तयार केल्याची चर्चा आहे. या मोहिमेद्वारे सुनेत्रा पवार यांना राज्याच्या राजकारणात अजित पवारांचा चेहरा म्हणून पुढे आणण्याची तयारी सुरू झाली आहे. या संदर्भात नुकतीच पुणे सर्किट हाऊसमध्ये महत्त्वाची बैठक पार पडल्याचे सांगितले जाते.

अजित पवार यांच्या पश्चात विस्कळीत झालेली पक्षरचना पुन्हा उभी करणे आणि कार्यकर्त्यांमध्ये विश्वास निर्माण करणे हा या मोहिमेचा उद्देश असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. सुनेत्रा पवार यांची प्रतिमा खंबीर महिला नेतृत्व म्हणून उभी करण्यावर भर दिला जाणार आहे. अजित पवारांनी सुरू केलेली कामे आणि त्यांचा जनसंपर्क सुनेत्रा पवार यांच्या माध्यमातून पुढे नेण्याचा आराखडा तयार करण्यात आल्याचे सांगितले जाते.

राज्यभर दौरे, महिला मेळावे आणि स्थानिक पातळीवरील संवाद कार्यक्रमांवर विशेष भर देण्यात येणार आहे. २०२९ च्या निवडणुका लक्षात घेऊन महिला मतदारांवर केंद्रित प्रचार मोहीम उभारण्याची योजना आहे. महिलांना दिलेले ३० टक्के आरक्षण आणि 'लाडकी बहीण' योजनेचा प्रभाव टिकवून ठेवण्यासाठी व्यापक जाळे उभे करण्याची रणनीती आखली जात आहे.

अजित पवार यांच्या निधनानंतर 'डिझाईन बॉक्स' या कंपनीच्या भवितव्याबाबतही राजकीय वर्तुळात चर्चा होती. पक्षातील वरिष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांनी या कंत्राटाबाबतचा निर्णय सुनेत्रा पवार यांच्या स्तरावर सोपविल्याची चर्चा आहे. शुक्रवारी पुणे सर्किट हाऊसमध्ये नरेश अरोरा यांनी सुनेत्रा पवार, पार्थ पवार आणि जय पवार यांची भेट घेतली. सुमारे ४५ मिनिटे चाललेल्या बैठकीत सविस्तर सादरीकरण करण्यात आल्याचे सांगितले जाते.

नरेश अरोरा हे 'डिझाईन बॉक्स' या राजकीय रणनीती आखणाऱ्या संस्थेचे प्रमुख मानले जातात. राजकीय प्रतिमा घडविणे, संदेश व्यवस्थापन आणि प्रचार मोहिमांचे नियोजन यात त्यांचा अनुभव आहे. लोकसभा निवडणुकीनंतर पक्षाला बळकटी देण्यासाठी त्यांनी आखलेली 'गुलाबी' प्रचार संकल्पना चर्चेत आली होती. विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादीचे ४१ आमदार निवडून येण्यात त्यांच्या रणनीतीचा वाटा असल्याचे मानले जाते. अजित पवार यांच्या पश्चात पक्षाची घडी बसविणे आणि सुनेत्रा पवार यांच्या माध्यमातून नव्या नेतृत्वाचा चेहरा उभा करणे हेच या नव्या मोहिमेचे ध्येय असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

## पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्याला वेग

### ४-बी आणि ४-सी मार्गिकांसाठी निविदा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यातील कामांना वेग आला असून ४-बी आणि ४-सी या नव्या मार्गिकांसाठी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. महा मेट्रो कडून सल्लागार नेमण्यासाठी निविदा मागवण्यात आल्या असून ५ मार्च २०२६ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली आहे.

४-बी मार्गिका हडपसर ते लोणी काळभोर दरम्यान उभारण्यात येणार आहे. ही सुमारे ११.१०२ किलोमीटर लांबीची उन्नत मार्गिका असेल. या मार्गिकेवर एकूण १० स्थानके प्रस्तावित आहेत. हडपसर फाटा, हडपसर बस डेपो, आकाशवाणी-हडपसर, लक्ष्मी कॉलनी, मंजरी फाटा, द्राक्ष बाग, टोल नाका, वाक वस्ती आणि लोणी काळभोर अशी स्थानके असतील. यात दुहेरी स्तराचा उड्डाणपूल उभारण्यात येणार असून खालच्या स्तरावर वाहनांसाठी रस्ता आणि वरच्या स्तरावर मेट्रो मार्गिका असे नियोजन आहे. ४-सी मार्गिका हडपसर ते सासवड अशी सुमारे ५.५७३ किलोमीटर लांबीची असेल. या मार्गिकेवर चार स्थानके प्रस्तावित आहेत. हडपसर ग्लायडिंग क्लब, फुरसुंगी माहिती तंत्रज्ञान उद्यान, सुलभ उद्यान आणि सासवड रस्ता रेल्वे स्थानक अशी स्थानके निश्चित करण्यात आली आहेत. या मार्गिकेसाठीही दुहेरी स्तराचा उड्डाणपूल उभारला जाणार आहे. या मार्गिका खडकवासला–खराडीचा भाग असतील. या प्रकल्पातील दोन उड्डाणपूल पुणे–सोलापूर महामार्गाशी संलग्न असतील. त्यामुळे पूर्व आणि दक्षिण उपनगरांना थेट जोडणी मिळणार असून वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल.

दरम्यान, पुणे मेट्रोच्या तिसऱ्या टप्प्यातील हिंजवडी–शिवाजीनगर मार्गिकेचे काम अंतिम टप्प्यात असून लवकरच ती प्रवाशांसाठी सुरू होणार आहे. विस्तारीकरणामुळे शहराच्या वाढत्या उपनगरांना सार्वजनिक वाहतुकीचा सक्षम पर्याय उपलब्ध होणार असल्याचे चित्र आहे.

### अविश्वास ठरावावर ९ तारखेला चर्चा

**नवी दिल्ली :** केंद्रीय संसदीय कामकाजमंत्री किरण रिजिजू यांनी रविवारी जाहीर केले की लोकसभा सभापती ओम बिर्ला यांच्याविरुद्ध विरोधकांनी दिलेल्या अविश्वास प्रस्तावावर ९ मार्च रोजी चर्चा होऊन त्याच दिवशी मतदान घेतले जाईल. सभागृह पुन्हा सुरू होताच हा प्रस्ताव मांडला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा ९ मार्च ते २ एप्रिल दरम्यान होणार असून तो "रंजक" ठरेल. अनेक महत्त्वाची विधेयके चर्चेसाठी व मंजुरीसाठी सादर केली जाणार असून एक "अतिशय महत्त्वाचे" विधेयकही मांडले जाईल, मात्र त्याचा तपशील आज उघड केला जाणार नाही, असे त्यांनी नमूद केले.

## वीज वितरणाला पहिल्यांदाच नफा

### १६ व्या वित्त आयोगाकडून कठोर सुधारणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारताच्या वीज वितरण क्षेत्राने आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. वितरण कंपन्यांनी एकूण २,७०१ कोटी रुपयांचा करपश्चात नफा नोंदवला असून सलग तोट्यानंतर प्रथमच हा सकारात्मक निकाल लागला आहे. मागील आर्थिक वर्षात २५,५५३ कोटी रुपयांचा तोटा झाला होता.


या बदलामागे एकूण तांत्रिक आणि व्यावसायिक तोट्यात सुमारे १५ टक्क्यांपर्यंत घट, बिलिंग आणि वसुली कार्यक्षमतेत सुधारणा तसेच पुरवठ्याच्या सरासरी खर्च आणि सरासरी महसूल यातील तफावत कमी होणे ही कारणे सांगितली जात आहेत. 'उदय' योजना, सुधारित वितरण क्षेत्र योजना, व्यापक स्मार्ट मीटर बसविण्याची मोहीम आणि विलंबित देयकांवरील कडक नियम यांनी सुधार प्रक्रियेला चालना दिली. तथापि, अनेक राज्यांमध्ये वाढती अनुदाने, उच्च वारसा कर्जे, आंतरराज्यीय कामगिरीतील तफावत आणि बाह्य वीज खरेदीवरील अवलंबित्व यामुळे दीर्घकालीन स्थैर्यावर प्रश्नचिन्ह कायम आहे. राष्ट्रीय स्तरावर वितरण कंपन्यांचे थकित कर्ज ६ ते ७ लाख कोटी रुपयांदरम्यान असल्याचे अंदाज आहेत.

आयोगाने वितरण कंपन्यांच्या अकार्यक्षमतेला उप-राष्ट्रीय वित्तीय जोखमींपैकी एक प्रमुख घटक मानले आहे. खाजगी भांडवल आणि व्यवस्थापन शिस्त आणण्यासाठी खाजगीकरण हा "प्रथम प्राधान्य" पर्याय असल्याचे नमूद करण्यात आले आहे. याशिवाय, उत्पादन-वितरण विभाजन, नियामक आयोगांना अधिक अधिकार आणि खर्च-प्रतिबिंबित दररचना लागू करण्याच्या शिफारशी करण्यात आल्या आहेत. राजस्थान, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, तामिळनाडू आणि तेलंगणा या राज्यांमध्ये ऐतिहासिकदृष्ट्या उच्च तोटे आणि कर्जभार आढळतो. राष्ट्रीय पातळीवरील एकूण तोट्याच्या ७० ते ७५ टक्के भार या राज्यांवर असल्याचे निदर्शनास आले आहे. कृषी व घरगुती मोफत वीज योजनांमुळे अनुदानाचा दबाव वाढला आहे.

### उत्तीर्ण होण्यासाठी सप्टेंबर २०२७ ही अंतिम मुदत

# १.१ लाख शिक्षकांवर टीईटीची टांगती तलवार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** सरकारी आणि खासगी शाळांमधील ५० वर्षांवरील १.१ लाखांहून अधिक शिक्षकांना सप्टेंबर २०२७ पर्यंत शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण करणे बंधनकारक ठरणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या सप्टेंबर २०२५ मधील निर्णयानंतर ही अट सेवारत शिक्षकांनाही लागू झाली असून ९० टक्के शिक्षकांवर त्याचा परिणाम होत आहे.

राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने केंद्र सरकारकडे सादर करण्यासाठी संकलित केलेल्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्रातील एकूण ४,९५,४३७ शिक्षकांपैकी ४.४ लाखांहून अधिक शिक्षकांना आता शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण करावी लागणार आहे. त्यापैकी १.१ लाख शिक्षक ५० वर्षांपेक्षा अधिक वयाचे आहेत.

प्रामुख्याने सरकारी शाळांतील शिक्षकांबाबत चिंता असल्या तरी संकलित आकडेवारीत स्वयंअर्थसहाय्यित शाळांतील शिक्षकांचाही समावेश आहे. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, सुमारे १.५ लाख सरकारी शिक्षकांकडे अद्याप शिक्षक पात्रता प्रमाणपत्र नाही.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार, केवळ नव्या नियुक्त्यांसाठी नव्हे तर पाच वर्षांपेक्षा अधिक सेवा शिल्लक असलेल्या विद्यमान शिक्षकांनाही ही पात्रता बंधनकारक आहे. आदेशाच्या दोन वर्षांत परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास सक्तीची निवृत्तीचा पर्याय लागू होऊ शकतो. यामुळे आधीच शिक्षक टंचाईचा सामना करणाऱ्या शाळांमध्ये मनुष्यबळाची कमतरता वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. राज्यातील २.५ लाखांहून अधिक शिक्षकांची नियुक्ती २०११ पूर्वी झाली होती. त्याच वर्षी राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद यांनी भरतीसाठी शिक्षक पात्रता परीक्षा निकष म्हणून लागू केली होती. प्राथमिक स्तरावर स्थिती अधिक गंभीर आहे. इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंत ३,०६,३३६ शिक्षक कार्यरत आहेत; त्यापैकी फक्त २२,९७५ शिक्षक परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत. जवळपास ९२ टक्के शिक्षकांकडे आवश्यक पात्रता नाही. इयत्ता सहावी ते आठवीपर्यंत १,८९,१०१ शिक्षकांपैकी केवळ २६,४९० शिक्षक पात्र ठरले आहेत. या निर्णयानंतर शिक्षकांमध्ये चिंतेचे वातावरण असून २०२५ मधील परीक्षेसाठी ४.७ लाखांहून अधिक उमेदवारांनी नोंदणी केली होती. ३ फेब्रुवारीला जाहीर झालेल्या निकालानुसार एकूण उत्तीर्णतेचे प्रमाण ११.२८ टक्के होते. राज्याने वर्षातून एकाऐवजी दोन वेळा परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे सप्टेंबर २०२७ पूर्वी पात्रता मिळविण्याची संधी असली तरी शिक्षकांवर दबाव कायम आहे.

### लाखो कुटुंबांवर थेट परिणाम

- या निर्णयामुळे अनेक ज्येष्ठ शिक्षकांच्या कुटुंबांवर आर्थिक आणि मानसिक परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दीर्घकाळ सेवा बजावलेल्या शिक्षकांना अचानक सक्तीची निवृत्तीचा सामना करावा लागल्यास त्यांच्या कुटुंबाचा मुख्य उत्पन्न स्रोत धोक्यात येऊ शकतो. सरकारकडून संरक्षणात्मक उपाययोजना अपेक्षित असून, शिक्षक संघटनांशी संवाद साधून संतुलित निर्णय घेणे हीच या टप्प्यावर सरकारसमोरील मोठी जबाबदारी मानली जात आहे.

## दहशतवादविरोधी पथकाची धडक कारवाई; यवतमाळमध्ये छापे

■ दैनिक राज्य लोकतंत्र


**यवतमाळ :** राज्य दहशतवाद विरोधी पथक यांनी यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड आणि पुसद येथे रविवारी मध्यरात्रीपासून मोठ्या प्रमाणावर गोपनीय शोधमोहीम राबविली. या कारवाईत एकूण १४ ठिकाणी छापे टाकण्यात आले असून काही संशयितांना चौकशीसाठी ताब्यात घेतल्याची माहिती सूत्रांनी दिली.

अचानक झालेल्या या कारवाईमुळे दोन्ही शहरांमध्ये खळबळ उडाली आहे. प्राथमिक माहितीनुसार, काही व्यक्ती दहशतवादी संघटनांच्या संपर्कात राहून स्थानिक तरुणांना कट्टरवादी विचारांकडे वळवण्याचा प्रयत्न करीत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर राज्य पथकाने अत्यंत गोपनीयतेने नियोजन करून एकाच वेळी विविध ठिकाणी धाडी टाकल्या. या प्रकरणात माजी सिमी या बंदी घातलेल्या संघटनेशी संबंधित काही व्यक्ती आणि ठिकाणांचा तपास सुरू असल्याची चर्चा आहे. त्यामुळे या कारवाईला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

पुसद शहरातील वसंतनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अनेक ठिकाणी एकाच वेळी छापे टाकण्यात आले. कागदपत्रे, मोबाईल दूरध्वनी संच तसेच इतर डिजिटल उपकरणे जप्त करण्यात आली आहेत. या उपकरणांची सखोल तपासणी केली जात असून त्यातून महत्त्वाची माहिती मिळण्याची शक्यता आहे. उमरखेड परिसरातही मागोवा घेण्यासाठी स्वतंत्र पथके कार्यरत होती.

## संपादकीय

# कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आयटी अर्थव्यवस्थेचा मिन्स्की क्षण



**भारतीय आयटी क्षेत्राने यंदा प्रथमच आपल्या अभेद्यतेचा भ्रम गमावला. काही दिवसांत लाखो कोटींचे बाजारमूल्य पुसले गेले आणि माहिती-तंत्रज्ञानाच्या दिग्गज कंपन्या दोन वर्षांपूर्वीच्या पातळीवर परतल्या. हा बाजारातील उतार नसून कृत्रिम बुद्धिमत्तेच्या नव्या वास्तवाचा ठोस इशारा आहे.**

भारतीय भांडवली बाजाराने या आठवड्यात अस्वस्थ करणारा टप्पा अनुभवला. माहिती-तंत्रज्ञान आणि सॉफ्टवेअर सेवा क्षेत्रातील आघाडीच्या कंपन्यांचे समभाग घसरले. दोन दिवसांत सुमारे तीन लाख कोटी रुपयांचे बाजारमूल्य नाहीसे झाले. टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस आणि इन्फोसिससारख्या कंपन्यांच्या किमती लक्षणीयरीत्या खाली आल्या. हा आकड्यांचा खेळ नाही; हा आत्मविश्वासाच्या पायाला गेलेला तडा आहे. जागतिक पातळीवरही स्थिती वेगळी नाही. सॉफ्टवेअर आणि सेवा क्षेत्रातील अनेक कंपन्यांनी अब्जावधी डॉलरचे मूल्य गमावले. गुंतवणूकदारांनी नाट्यमय शब्दप्रयोग केले; परंतु वास्तव अधिक गंभीर आहे. सॉफ्टवेअर हा अखंड वाढीचा स्रोत आहे, हा समज ढासळत आहे. या धक्क्याच्या मुळाशी कृत्रिम बुद्धिमत्ता आहे. संगणकशास्त्रातील लक्ष-यंत्रणेच्या संकल्पनेने काही वर्षांपूर्वी नवी दारे उघडली. आज ती व्यवसाय-मॉडेल्स बदलणारी शक्ती ठरत आहे. आधी यंत्रे मनुष्याला सहाय्य करीत; आता ती निर्णय, अंमलबजावणी आणि सुधारणा स्वतः करीत आहेत. कोड लेखनापासून त्रुटी दुरुस्तीपर्यंतची प्रक्रिया स्वयंचलित होत आहे. याचा परिणाम आयटी सेवांच्या पारंपरिक रचनेवर होतो. प्रति-तास बिलिंग, मोठ्या प्रमाणावर प्रवेशस्तरावरील भरती, ग्राहकांसाठी मोठी पथके या संकल्पना प्रश्नांकित झाल्या आहेत. परिणामाधिष्ठित शुल्क आणि कमी मनुष्यबळावर आधारित प्रकल्प पुढे येत आहेत. परिणामी भरती मंदावणे, काही ठिकाणी कपात होणे, अपरिहार्य ठरत आहे. भारतातील माहिती-तंत्रज्ञान क्षेत्र निर्यात उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे. सुमारे पन्नास लाखांहून अधिक लोक या क्षेत्रात कार्यरत आहेत. मध्यमवर्गाची खरेदीशक्ती, शहरी अर्थचक्र, शिक्षणातील गुंतवणूक या सर्वांचा आधार याच क्षेत्रावर आहे. प्रवेशस्तरावरील नोकऱ्या कमी झाल्यास त्याचे परिणाम उपभोगावर आणि शिक्षण-रोजगाराच्या आकांक्षांवर दिसतील. कृत्रिम बुद्धिमत्ता तांत्रिक क्रांतीसोबत भू-राजकीय धोरणाचाही भाग बनली आहे. स्वयंचलनामुळे कामगारांवरील अवलंबित्व कमी करणे, उत्पादनक्षमता वाढवणे आणि आयातित कौशल्यावरील गरज घटवणे ही अनेक देशांची उद्दिष्टे आहेत. कर-सवलती, संशोधनातील गुंतवणूक आणि संरक्षणात्मक धोरणांमुळे या तंत्रज्ञानाला गती मिळाली आहे. भारतात प्रश्न वेगळा आहे. आपण सेवा पुरवठादार राहणार की तंत्रज्ञाननिर्माते होणार? कृत्रिम बुद्धिमत्ता स्वीकारणे आवश्यक आहे; त्याचवेळी कौशल्य-रचना बदलणेही गरजेचे आहे. डेटा विज्ञान, यंत्र-अभ्यास, संगणकीय रचना या क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर पुनर्प्रशिक्षण अपेक्षित आहे. विद्यापीठे, उद्योग आणि सरकार यांच्यात समन्वयाशिवाय हे साध्य होणार नाही. परिषदांचे आयोजन आणि भागीदारीची घोषणे स्वागतार्ह आहेत; पण त्यातून ठोस कृती आराखडा हवा. आरोग्य, शेती, शिक्षण, प्रदूषण नियंत्रण अशा क्षेत्रांत या तंत्रज्ञानाचा वापर करून सामाजिक परिणाम साधता येतील. अन्यथा ही क्रांती बाजारमूल्यांच्या चढउतारापुरती मर्यादित राहील. अर्थतज्ज्ञ हायमन मिन्स्की यांनी मांडलेला 'क्षण' म्हणजे स्थैर्याच्या अतिरेकातून उद्भवणारी अस्थैर्याची जाणीव. आयटी क्षेत्रासाठी हा तसाच टप्पा ठरू शकतो. दीर्घकाळ अखंड वाढ अनुभवल्यानंतर आता वास्तवाचे भान येत आहे. प्रश्न असा आहे की या धक्क्यातून नव्या दिशेने वळण्याची तयारी आहे का. कृत्रिम बुद्धिमत्तेची भीती वास्तव आहे; परंतु भीतीत अडकणे अधिक धोकादायक. लक्ष द्यायचे ते कौशल्यविकास, संशोधन आणि सामाजिक परिणामांवर. अन्यथा बाजारातील हा उतार सुरुवात ठरेल आणि भारतीय आयटी अर्थव्यवस्थेचा आत्मविश्वास दीर्घकाळ डळमळीत राहील. या घडामोडींचे आकलन करताना दोन स्तर वेगळे पाहावे लागतील. पहिला स्तर बाजारमानसशास्त्राचा. दीर्घकाळ उच्च मूल्यमापनावर व्यवहार झालेल्या आयटी समभागांमध्ये वाढीचा दर कायम राहील, अशी गृहीतके गुंतवणूकदारांनी बांधली होती. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे उत्पादकता झपाट्याने वाढेल, पण त्याच वेळी पारंपरिक सेवा-आधारित महसूल कमी होऊ शकतो, ही जाणीव बाजाराने उशिरा स्वीकारली. परिणामी दुरुस्ती तीव्र झाली. दुसरा स्तर संरचनात्मक बदलांचा. मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळावर आधारलेले प्रकल्प, दीर्घकालीन करार आणि स्थिर मार्जिन ही रचना आव्हानासमोर उभी आहे. स्वयंचलित कोड-निर्मिती, चाचणी आणि देखभाल यामुळे ग्राहक कमी खर्चात अधिक वेग अपेक्षित धरत आहेत. त्यामुळे भारतीय कंपन्यांनी प्रमाणाऐवजी बौद्धिक संपदा, प्लॅटफॉर्म-आधारित उपाय आणि संशोधन गुंतवणुकीकडे वळणे अपरिहार्य ठरणार आहे. हा बदल जितक्या लवकर स्वीकारला जाईल, तितकी धक्क्याची तीव्रता कमी राहील.

# ढाक्याची नवी घडी आणि उपखंडाची परीक्षा!

**» शेख हसीना यांच्या पदच्युतीनंतर अठरा महिन्यांनी बांगलादेशात स्पष्ट जनादेशासह नवे सरकार सत्तेवर आले आहे. तारिक रहमान यांच्या नेतृत्वाखालील बीएनपीचा विजय हा केवळ सत्तांतर नाही; तो स्थैर्य, घटनात्मक पुनर्रचना आणि उपखंडातील नव्या सामरिक समीकरणांची नांदी ठरू शकतो.**



शेख हसीना यांना पदच्युत करून भारतात आश्रय घ्यावा लागल्यानंतर अठरा महिने उलटले आणि अखेर बांगलादेशात स्पष्ट जनादेशासह नवे सरकार स्थापन झाले. तारिक रहमान यांच्या नेतृत्वाखालील बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीचा निर्णायक विजय हा केवळ सत्तांतर नाही; तो अस्थिरतेनंतरच्या स्थैर्याच्या शोधाचा परिणाम आहे. संसदीय निवडणुकांबरोबर झालेल्या जनमत चाचणीत घटनात्मक सुधारणांना मिळालेला पाठिंबा या बदलाला अधिक संस्थात्मक अधिष्ठान देतो. गेल्या दीड वर्षांत बांगलादेशने जे अनुभवले ते लोकशाहीतील रिक्ततेचे धडे होते. मुहम्मद युनूस यांच्या देखरेखीखालील संक्रमणकाळात अतिरेकी प्रवाहांना मोकळीक मिळाली, अर्थव्यवस्था मंदावली आणि भारताशी संबंधांमध्ये दुरावा जाणवू लागला. सत्तेचा निर्वात हा नेहमीच विविध शक्तींना आमंत्रण देतो; ढाक्यात तेच घडले. त्यामुळे या निवडणुकीकडे सामान्य सत्तास्पर्धा म्हणून पाहणे अपुरे ठरेल. हा निवाडा अस्थिरतेवर शिक्कामोर्तब करणारा आहे. तारिक रहमान यांचे पुनरागमन हे राजकीयदृष्ट्या प्रतीकात्मक आहे. दीर्घकाळ निर्वासित जीवन, कुटुंबाचा राजकीय वारसा आणि अवामी लीग–बीएनपी या द्वैतवादाने घडवलेली राजकीय संस्कृती या सर्वांचा संगम त्यांच्या नेतृत्वात दिसतो. निर्णायक बहुमतामुळे त्यांना स्थैर्य देणारी संख्या मिळाली आहे; परंतु संख्येचे बळ हे सुशासनाचे पर्यायवाची नसते. त्यातून संस्थात्मक संयम, संवाद आणि व्यापक सहभाग निर्माण झाला तरच हा जनादेश अर्थपूर्ण ठरेल. जमात-ए-इस्लामी दुसऱ्या क्रमांकावर असली, तरी सरकार घडवण्याइतकी संख्या तिच्याकडे नाही. हा आकडा महत्त्वाचा आहे. कारण गेल्या काही महिन्यांत कट्टर प्रवाहांच्या उदयाबद्दल देशांतर्गत आणि प्रादेशिक पातळीवर चिंता व्यक्त होत होती. मतदारांनी स्पष्टपणे बहुमत एका मुख्य प्रवाहातील पक्षाला दिले आहे. याचा अर्थ ढाक्याचे राजकारण अद्याप अवामी लीग–बीएनपी या पारंपरिक रचनेतच घडते आहे. अवामी लीगवरील बंदीमुळे निवडणुकीवर सावली पडली असली, तरी द्वैतवादाची चौकट अबाधित आहे. आता सर्वांत मोठी कसोटी अतिरेकीपणा रोखण्याची आणि अल्पसंख्याकांचे संरक्षण करण्याची आहे. विशेषतः हिंदू समुदायाविरुद्ध हिंसाचाराच्या हजारो घटना संक्रमणकाळात नोंदल्या गेल्या. तारिक रहमान यांनी धार्मिक स्वातंत्र्य आणि सांप्रदायिक सलोखा राखण्याचे आश्वासन दिले आहे; परंतु आश्वासन आणि अंमलबजावणी यांमध्येच राजकारणाची खरी परीक्षा दडलेली असते. कायदा-सुव्यवस्था केवळ घोषणांनी सुधरत नाही; त्यासाठी पोलिस यंत्रणा, न्यायव्यवस्था आणि स्थानिक प्रशासन यांची सुसंगत कृती आवश्यक असते. सलोख्याचा प्रश्न तितकाच गुंतागुंतीचा आहे. शेख हसीना यांचे पतन हे त्यांच्या वाढत्या केंद्रीकरणाचे आणि राजकीय विरोधकांविषयीच्या कठोर भूमिकेचे परिणाम होते, हे मान्य करावे लागेल. पण त्यानंतर अवामी लीगशी संबंधित कार्यकर्त्यांवर झालेला हिंसाचारही लोकशाहीस पोषक नव्हता. नवे सरकार जर सूडाच्या राजकारणात अडकले, तर अस्थिरतेचे चक्र पुन्हा सुरू होईल. उलट, अवामी लीगला भविष्यात राजकीय प्रक्रियेत परतण्याचे मार्ग खुले ठेवले, तर लोकशाहीची घडी मजबूत होईल. अर्थव्यवस्था ही आणखी एक तातडीची चिंता आहे. वस्त्रोद्योग, परदेशी चलनसाठा आणि रोजगार या क्षेत्रांत मंदीची चिन्हे स्पष्ट आहेत. जागतिक बाजारातील अस्थिरता आणि अंतर्गत राजकीय तणाव यांचा संयुक्त परिणाम अर्थव्यवस्थेवर झाला. बीएनपीसमोर वित्तीय शिस्त, परकीय गुंतवणूक आणि पायाभूत सुविधा यांना गती देण्याचे आव्हान आहे. लोकप्रियतेचा वेग आणि अर्थकारणाची शिस्त यांचा मेळ घालणे हे कोणत्याही नव्या सरकारसाठी कठीण असते; ढाक्यातही अपवाद नसेल. भारताशी संबंधांचा प्रश्न विशेष उल्लेखनीय आहे. नवी दिल्ली बीएनपीशी अपरिचित नाही. तारिक रहमान यांनी भारताबाबत सलोख्याची भूमिका व्यक्त केली आहे आणि दोन्ही देशांतील स्थैर्याचे महत्त्व अधोरेखित केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेले अभिनंदन हे सकारात्मक संकेत ठरले आहे. तरीही अलीकडील काही सांस्कृतिक आणि क्रीडा संदर्भातील वाद, तसेच शेख हसीना यांच्या संभाव्य प्रत्यार्पणाचा मुद्दा, संवेदनशील ठरू शकतो. या प्रश्नांवर भावनांपेक्षा व्यवहाराला प्राधान्य दिले गेले, तर द्विपक्षीय संबंध अधिक स्थिर होतील. ढाक्यातील बदल नवी दिल्लीसाठीही संधी आहे. अवामी लीगशी दीर्घकालीन समीकरणांच्या पलीकडे जाऊन व्यापक बांगलादेशी समाजाशी संवाद वाढवण्याची वेळ आली आहे. सीमापार सहकार्य, पायाभूत प्रकल्प, ऊर्जा आणि सुरक्षा या क्षेत्रांत सातत्य राखणे दोन्ही देशांच्या हिताचे आहे. स्थिर, आत्मविश्वासी आणि समावेशक बांगलादेश हा भारतासाठीही लाभदायी ठरतो. बांगलादेशातील हा जनादेश स्थैर्याची हमी देत नाही; तो स्थैर्याची शक्यता निर्माण करतो. त्या शक्यतेचे रूपांतर वास्तवात करण्याची जबाबदारी तारिक रहमान यांच्या नेतृत्वावर आहे. लोकशाहीची ताकद केवळ सत्ताबदलात नसते, तर सत्तेच्या मर्यादा स्वीकारण्यात असते. ढाक्याने जर हा धडा आत्मसात केला, तर उपखंडात एका प्रगल्भ राजकीय टप्प्याची सुरुवात होईल. अन्यथा हा बदलही इतिहासातील आणखी एक अस्थिर अध्याय ठरेल.

# कौशल्य विकास महासंघाच्या पिंपरी-चिंचवड (पुणे) अध्यक्षपदी सचिन कदम यांची निवड

**शिर्डीतील अधिवेशनात महत्त्वपूर्ण पदनियुक्त्या, युवकाभिमुख उपक्रमांना गती देण्याचा निर्धार**

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास महासंघाच्या तिर्थक्षेत्र शिर्डी येथे पार पडलेल्या राज्यव्यापी अधिवेशनात विविध महत्त्वपूर्ण पदनियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. अध्यक्ष लक्ष्मणराव झणझणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या अधिवेशनात सर्वानुमते निर्णय घेण्यात आले. पिंपरी-चिंचवड (पुणे) अध्यक्षपदी श्री सचिन कदम यांची निवड करण्यात आली. युवकांना रोजगाराभिमुख प्रशिक्षणाशी जोडणे, स्थानिक पातळीवर संघटन मजबूत करणे आणि कौशल्य विकास उपक्रमांना गती देणे यासाठी ते प्रयत्नशील राहतील, अशी अपेक्षा अधिवेशनात व्यक्त झाली.

राज्य विभागीय अध्यक्षपदी विधीज्ञ प्रकाश यादव यांची निवड करण्यात आली. सामाजिक व संघटनात्मक क्षेत्रातील सक्रिय योगदान, कायद्याचे सखोल ज्ञान आणि प्रशासकीय समन्वय क्षमता लक्षात घेऊन त्यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आल्याचे अधिवेशनात स्पष्ट करण्यात आले. त्यांच्या नेतृत्वाखाली महासंघाच्या कार्याला नवी दिशा मिळेल, असा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, पुणे विभाग सचिवपदी संजय पाटील यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. संघटनात्मक अनुभवाच्या जोरावर महासंघाचा विस्तार आणि युवकाभिमुख योजनांना चालना मिळेल, असा आशावाद उपस्थितांनी व्यक्त केला. राज्य स्तरावरील मार्गदर्शक म्हणून ॲडव्होकेट श्री विशाल डोंगरे यांची एकमताने निवड करण्यात आली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली महासंघाचे धोरणात्मक नियोजन अधिक प्रभावी होईल, अशी भावना व्यक्त करण्यात आली. अधिवेशनात युवकांसाठी तांत्रिक प्रशिक्षण, स्वयंरोजगार संधी, उद्योगाभिमुख कौशल्य प्रशिक्षण आणि शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी यावर विशेष भर देण्यात आला. ग्रामीण आणि शहरी भागात कौशल्य विकास चळवळ अधिक व्यापक करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# पुण्यात साकारणार 'संविधान उद्यान'

**उपमहापौर वाडेकरांच्या संकल्पनेला हिरवा कंदील**

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** भारतीय संविधानाच्या मूल्यांची जाणीव नागरिकांमध्ये रुजविण्यासाठी पुणे महापालिकेतर्फे 'संविधान उद्यान' साकारण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेण्यात येणार आहे. उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी मांडलेल्या या संकल्पनेला महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

महापालिकेच्या वर्धापन दिनानिमित्त संभाजी उद्यान येथे आयोजित फुले, फळे व भाजीपाला प्रदर्शनाच्या उद्‌घाटनप्रसंगी ही घोषणा करण्यात आली. यावेळी सभागृह नेते गणेश बीडकर, अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे, पृथ्वीराज बनकर, उद्यान विभागाचे प्रमुख घोरपडे आदी मान्यवर उपस्थित होते. देशाचा कारभार सुरळीत चालविणाऱ्या भारतीय संविधानाची ओळख सर्वसामान्य नागरिकांना, विशेषतः विद्यार्थी वर्गाला व्हावी, संविधानातील मूल्ये, अधिकार व कर्तव्ये समजावीत, या उद्देशाने हे उद्यान उभारले जाणार आहे. संविधानातील प्रस्तावना, मूलभूत अधिकार, कर्तव्ये आणि महत्त्वपूर्ण ऐतिहासिक टप्पे यांचे माहितीफलक व शिल्परूप सादरीकरण उद्यानात करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. या प्रकल्पासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाही उपमहापौर वाडेकर यांनी दिली.

# महामेट्रोकडून पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्याला वेग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्याच्या कामाला वेग आला असून MahaMetroने मेट्रो लाईन 4-B आणि 4-C साठी निविदा प्रक्रिया सुरू केली आहे. सल्लागार नेमणुकीसाठी ५ मार्च २०२६ ही अंतिम मुदत देण्यात आली आहे. या टप्प्यात एकूण १४ स्थानकांचे बांधकाम प्रस्तावित आहे.

लाईन 4-B ही ११.१०२ किमी लांबीची उन्नत मार्गिका हडपसर ते लोणी काळभोर अशी असणार असून या मार्गिकेवर १० स्थानके उभारली जाणार आहेत. हडपसर फाटा, हडपसर बस डेपो, आकाशवाणी-हडपसर, लक्ष्मी कॉलनी, मंजरी फाटा, द्राक्ष बाग, टोल नाका, वाक वस्ती आणि लोणी काळभोर ही प्रमुख स्थानके असतील. या प्रकल्पात डबल डेकर उड्डाणपूल संकल्पना राबविण्यात येणार असून खालच्या स्तरावर वाहनांसाठी उड्डाणपूल तर वरच्या स्तरावर मेट्रो मार्गिका उभारली जाणार आहे.

तर लाईन 4-C हडपसर ते सासवड अशी असणार असून या मार्गिकेवर चार स्थानके प्रस्तावित आहेत. या विस्तारीकरणामुळे हडपसर, फुरसुंगी, लोणी काळभोर आणि सासवड या वेगाने वाढणाऱ्या उपनगरांना थेट मेट्रो जोडणी मिळणार आहे. पूर्व व दक्षिण पुण्यातील वाहतूक कोंडी कमी करण्यास या प्रकल्पाचा मोठा हातभार लागणार असून पुणेकरांचा प्रवास अधिक जलद, सुरक्षित आणि कोंडीमुक्त होणार आहे.

# "स्वच्छता नसेल तर मीच झाडू घेईन" – उपमहापौर वाडेकरांचा इशारा

**घनकचरा विभाग प्रमुखांना तंबी; हजेरीत मोठ्या अनियमितता उघड**

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** पुणे प्रतिनिधी : शहरातील स्वच्छतेबाबत गंभीर अनियमितता आढळल्याने उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी घनकचरा विभागाला कडक इशारा दिला आहे. स्वच्छतागृह आणि कचऱ्याची नियमित साफसफाई झाली नाही, तर आपण स्वतः झाडू हाती घेऊन स्वच्छता करू, अशी तंबी त्यांनी घनकचरा विभाग प्रमुख अविनाश सपकाळ यांना दिली.

पदभार स्वीकारल्यानंतर अवघ्या चौथ्या दिवशी वाडेकर यांनी सकाळी सहा वाजता अचानक पाहणी दौरा केला. यावेळी क्षेत्रीय आयुक्त नायकर, मुख्य आरोग्य निरीक्षक इनामदार, आरोग्य निरीक्षक विनायक चोपडे, प्रवीण दरेकर, मुकादम संतोष शेलार, सिद्धार्थ बागुल आदी अधिकाऱ्यांसह दोन-तीन आरोग्य कोठ्यांना भेट देण्यात आली.

पाहणीदरम्यान उपस्थित कर्मचाऱ्यांची हजेरी तपासली असता खुद्द आरोग्य निरीक्षक अनुपस्थित असल्याचे आढळले. तसेच ५४ सफाई कर्मचाऱ्यांपैकी केवळ २३ कर्मचारी हजर होते. मात्र हजेरी पत्रकात १०० टक्के उपस्थिती दाखविण्यात आल्याचे समोर आले. यावरून अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये संगनमत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला.

वाडेकर यांनी उशिरा आलेल्या कर्मचाऱ्यांवर तातडीने दंडात्मक कारवाईचे आदेश दिले असून अनुपस्थित कर्मचाऱ्यांवरही कारवाई होणार असल्याचे स्पष्ट केले. "आरोग्य हा शहरासाठी अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. विशेषतः झोपडपट्टी भागात नागरिकांना अस्वच्छतेमुळे त्रास सहन करावा लागत आहे. सार्वजनिक शौचालयांची अवस्था बिकट असून कचरा वेळेवर उचलला जात नाही," अशी नाराजी त्यांनी व्यक्त केली.

**सेवाभाव, पर्यावरण जनजागृती आणि सामाजिक बांधिलकीचा प्रभावी संदेश**

# पुण्यात 'सेवा फेस्ट २०२६' सामाजिक उपक्रम उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** पुणे शहरातील सिंहगड रोड परिसरातील निसर्गरम्य पु. ल. देशपांडे उद्यान (जपानी गार्डन) येथे सेवा सहयोग फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेला "सेवा फेस्ट २०२६" हा सामाजिक उपक्रम उत्साहात आणि दिमाखात पार पडला. स्वयंसेवक, सामाजिक कार्यकर्ते आणि पुणेकर नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष उंची प्राप्त झाली.

"Revive, Rejoice & Rejuvenate the Spirit of Seva!" या प्रभावी घोषवाक्याखाली आयोजित या फेस्टमध्ये सेवाभाव, सहकार्य आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा ठाम संदेश देण्यात आला. विविध सामाजिक प्रकल्पांचे सादरीकरण करताना संस्थेच्या गेल्या काही वर्षांतील कामाचा सविस्तर आढावा मांडण्यात आला. स्वच्छता अभियान, घनकचरा व्यवस्थापन, शिक्षण प्रसार, महिला सक्षमीकरण, आरोग्य जनजागृती आणि समुदाय विकास या क्षेत्रांतील उपक्रमांची माहिती उपस्थितांसमोर सादर करण्यात आली.

कार्यक्रमादरम्यान घनकचरा व्यवस्थापन विषयक विशेष जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले. श्वेता सूर्यवंशी मॅडम, हेमंत भराडे सर, युवराज चाबुकवर सर आणि मंदार जाधव सर यांनी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व, घरगुती कचऱ्याचे योग्य वर्गीकरण, पुनर्वापर आणि पुनर्निर्मिती याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. 'स्वच्छ शहर, सुंदर शहर' ही संकल्पना केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची आहे, असा संदेश त्यांनी दिला.

यावेळी संघशिल भद्रे सर, गोविंद मोरे सर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि मोठ्या संख्येने पुणेकर नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमात स्वयंसेवकांनी सामाजिक उपक्रमांतील अनुभव कथन केले, तर काहींनी सेवाकार्यातून झालेला वैयक्तिक बदलही मांडला.

फेस्टमध्ये संवाद, सहभाग आणि प्रेरणा या तिन्ही घटकांचा सुंदर मिलाफ पाहायला मिळाला. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग नोंदवला. विविध माहिती स्टॉल्स, सादरीकरणे आणि प्रात्यक्षिकांमुळे उपस्थितांना प्रत्यक्ष कृतीची दिशा मिळाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सेवा सहयोग फाउंडेशन, सेवा फेस्ट टीम आणि सर्व स्वयंसेवकांचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले. 'सेवा हीच संस्कृती' या भावनेला अधिक बळ देत समाजहितासाठी एकत्र येण्याचा निर्धार या फेस्टमधून व्यक्त झाला. पुण्यातील सामाजिक चळवळीला नवसंजीवनी देणारा हा उपक्रम ठरल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.

# दारूच्या वादातून मित्राचा निर्घृण खून – येरवड्यातील घटना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** येरवड्यातील कामराजनगर परिसरात शनिवारी दुपारी दारू पिताना झालेल्या किरकोळ वादातून एक मित्राने आपल्या जवळच्या मित्रावर घातक हल्ला करून त्याचा खून केल्याची घटना घडली आहे. पोलिसांनी माशाक गाझिबक्श बीजापुरे (४०) या मृतकाचे नाव नोंदवले असून, हा येरवडाचा रहिवासी आहे आणि आरोपी गणेश वसंत शिंदे याला अटक केली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, माशाक आणि गणेश हे मित्र असून दुपारी पावणेतीनच्या सुमारास ते दारू पित होते. यावेळी दोघांमध्ये किरकोळ वाद झाला आणि माशाकने आरोपीला शिवीगाळ केली. या रागातून गणेशने शेजारी पडलेले दांडके उचलून माशाकच्या डोक्यावर भक्कम वार केला, ज्यामुळे तो तात्काळ बेशुद्ध झाला.

घटनेनंतर गणेश घाबरून पळाला, पण स्थानिक नागरिकांनी पोलिसांना माहिती दिल्यावर वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र कदम यांनी घटनास्थळी भेट देऊन माशाकला तातडीने खासगी रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाल्याची पुष्टी केली.

सायंकाळपर्यंत पळालेला आरोपी गणेश याला पोलिसांनी पकडून अटक केली. तक्रारदार आणि साक्षीदारांच्या तफ्तीशीनंतर त्याने दांडकेने हल्ला केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी म्हटले आहे. या प्रकरणी पुढील तपास सुरू आहे.

या हत्येमुळे मद्याच्या नशेत झालेल्या भांडणांचे गुन्हे किती घातक स्वरूप धारण करू शकतात, हे पुन्हा एकदा लक्षात येते. पोलीस प्रशासन या प्रकारांची प्रबळ दखल घेत पुढील कारवाई करत आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### ब्रह्माकुमारीजकडून अर्धनारीश्वर देखावा

**पुणे :** महाशिवरात्रीनिमित्त ब्रह्माकुमारीज यांच्या बाणेर येथील केंद्रात सहस्र शिवलिंग दर्शन, अर्धनारीश्वर जीवंत देखावा व आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्‌घाटन तृप्ती देसाई यांच्या हस्ते झाले. अर्धनारीश्वर देखाव्यातून महिला-पुरुष समानतेचा संदेश देण्यात आला. शिबिरात शेकडो नागरिकांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेतला, तर ४८ जणांनी रक्तदान केले. समाजहिताच्या उपक्रमांमुळे कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

### मारहाणीत व्यक्तीचा मृत्यू झाल्याने खळबळ



**मंचर :** मंचर पोलीस स्टेशन हद्दीत मारहाणीत एका ४३ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना १३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी देवकी प्लाझा परिसरात घडली. सोमनाथ कर्णराज गायकवाड यांना आरोपी अशोक दशरथ धोत्रे याने हाताने व वस्तूने मारहाण केल्याचा आरोप आहे. गंभीर दुखापतीमुळे त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक श्रीकांत कंकाळ करीत आहेत.

### बंद फ्लॅटला आग लाखोंचा ऐवज खाक

**मंचर :** आंबेगाव तालुक्यातील मंचर शहरातील डोबीमळा परिसरात बंद फ्लॅटला लागलेल्या आगीत सुमारे साडेतीन लाख रुपयांचा ऐवज जळून खाक झाला. शिक्षिका मोनिका थोरात व पती अरुण थोरात पुण्याला गेले असताना ही घटना घडली. शेजाऱ्यांनी दरवाजा तोडून आग विझवण्याचा प्रयत्न केला; मात्र घरातील वस्तू, रोख रक्कम व दागिने नष्ट झाले. शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज असून महसूल व पोलिसांनी पंचनामा केला आहे.

### पाच लाख मे. टन अतिरिक्त कोटा जाहीर, दर स्थिरावण्याची शक्यता

# साखर निर्यातीत वाढ; उद्योगाला दिलासा!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** केंद्र सरकारने साखर उद्योगाला मोठा दिलासा देत आधी जाहीर केलेल्या १५ लाख मेट्रिक टन निर्यातीव्यतिरिक्त आणखी सुमारे पाच लाख मेट्रिक टन साखर निर्यातीस परवानगी दिली आहे.

त्यामुळे साखरेच्या दरातील घसरण थांबून बाजारात स्थिरता येईल, असा अंदाज साखर वर्तुळातून व्यक्त होत आहे. उद्योगाकडून सातत्याने होत असलेल्या मागणीनुसार निर्यात कोटा वाढविल्याने कारखानदारांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

#### उत्पादन वाढीची अपेक्षा; शिलकी साठा मुबलक

२०२५-२६ च्या गाळप हंगामात देशात साखरेचे उत्पादन समाधानकारक होऊन शिलकी साठा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध राहील, अशी अपेक्षा हंगामाच्या सुरुवातीपासूनच व्यक्त होत होती. नवीन साखर बाजारात आल्यानंतर दरात घसरण झाली होती. विशेषतः ऊस गाळप वेगात सुरू झाल्यानंतर बाजारातील पुरवठा वाढल्याने साखरेचे दर दबावाखाली आले होते. या पार्श्वभूमीवर निर्यात कोटा वाढविण्याचा निर्णय बाजारातील मनोवृत्ती बदलण्यास महत्त्वाचा ठरणार आहे.

#### उद्योगाची नाराजी

साखरेची किमान विक्री किंमत (एमएसपी) प्रतिक्विंटल ३१०० रुपये इतकीच कायम आहे. वारंवार मागणी करूनही दरवाढ न झाल्याने उद्योगातून नाराजी व्यक्त होत आहे. दुसरीकडे, उसाच्या एफआरपीची रक्कम शेतकऱ्यांना अदा करताना कारखान्यांना आर्थिक ताण सहन करावा लागत होता. दरातील घसरण आणि साठा वाढ यामुळे अनेक कारखान्यांना कसरत करावी लागली होती.

#### सटोडियांची सक्रियता

नवीन निर्यात कोटा जाहीर होताच साखर बाजारात सटोडियांची सक्रियता वाढल्याचे घाऊक बाजारपेठेतून सांगण्यात आले. सुरुवातीला साखरेच्या दरात प्रतिक्विंटल १५ ते २० रुपयांची वाढ झाली. मात्र सध्या घाऊक बाजारात मागणी कमी असल्याने दर वाढ न होता स्थिरावले आहेत.

सध्या कारखान्यांच्या निविदा दर ३७०० ते ३७२५ रुपये प्रतिक्विंटल दरम्यान आहेत. तर घाऊक बाजारात एस-३० ग्रेड साखरेचा दर ४००० ते ४०२५ रुपये प्रतिक्विंटलवर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली.

एकूणच, निर्यात कोटा वाढविण्याच्या निर्णयामुळे साखर उद्योगाला तात्पुरता दिलासा मिळाला असून आगामी काळात बाजारातील परिस्थितीवर उत्पादन, साठा आणि निर्यातीचा वेग यांचा परिणाम होणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

## जुन्नरमध्ये महाशिवरात्री उत्सव उत्साहात; १२ शिवमंदिरांत दिवसभर धार्मिक कार्यक्रम



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जुन्नर :** महाशिवरात्री उत्सवानिमित्त जुन्नर शहरातील बारा प्रमुख शिवमंदिरांमध्ये भक्तिभावपूर्ण वातावरणात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. शहरातील पंचलिंग मंदिर, उत्तरेश्वर मंदिर, गिरनेश्वर मंदिर, रामेश्वर मंदिर, सूर्य कुंडेश्वर मंदिर, वैजनाथ मंदिर, वाळकेश्वर मंदिर, काशीविश्वेश्वर मंदिर, अस्तेश्वर मंदिर, नर्मदेश्वर मंदिर आणि जगदीश्वर मंदिर येथे सकाळपासूनच भाविकांची मोठी गर्दी उसळली होती.

पहाटेपासूनच शिवभक्तांनी रांगा लावून शिवलिंगाचे दर्शन घेतले. "बम-बम भोले"च्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला होता. अनेकांनी उपवास, रुद्राभिषेक व विशेष पूजा-अर्चा करून भगवान शंकराची आराधना केली. मंदिरांमध्ये दिवसभर अभिषेक, भजन, कीर्तन आणि नामस्मरणाचे कार्यक्रम रंगले.

महिलावर्ग, युवक आणि ज्येष्ठ नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत महाशिवरात्रीचा आनंद भक्तिभावाने साजरा केला. काही मंदिरांमध्ये रात्रभर जागरण व हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. मंदिर परिसर आकर्षक विद्युत रोषणाई व फुलांच्या सजावटीने उजळून निघाला होता. भाविकांसाठी खिचडी, केळी आणि दुधाचे वाटप करण्यात आले. हजारो शिवभक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

# बदलत्या हवामानाचा आंबेगावात आंबा उत्पादनावर फटका!

### पहाटे धुके, दुपारी कडक ऊन; गावरान व कलमी आंब्याचा मोहर गळू लागला

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लोणी-धामणी (ता. आंबेगाव):** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात सध्या पहाटे गारठा आणि दुपारी कडक ऊन असे संमिश्र वातावरण अनुभवायला मिळत आहे. त्यातच काही ठिकाणी पहाटे धुक्याबरोबरच रासायनिक धुराचे प्रमाणही जाणवत असल्याने गावरान तसेच कलमी आंब्याच्या उत्पादनावर विपरित परिणाम होत असल्याची चिंता शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

सध्या आंब्याच्या झाडांना आलेला मोहर मोठ्या प्रमाणात गळून पडत आहे. हवामानातील अचानक बदल, तापमानातील चढ-उतार आणि धुक्याचा परिणाम यामुळे फुलधारणा कमी होत असल्याचे आंबा उत्पादकांचे म्हणणे आहे. परिणामी यंदा आंबा उत्पादनात लक्षणीय घट होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मागील वर्षी मे महिन्यापासून सुरू झालेला पाऊस नोव्हेंबरपर्यंत सुरू राहिल्याने डिंभे धरणात मुबलक पाणीसाठा झाला आहे. त्यामुळे नदी व कालव्याच्या काठावरील गावांना शेतीसाठी बारमाही पाणी उपलब्ध झाले. पाण्याची उपलब्धता वाढल्याने तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी कलमी आंब्याच्या झाडांची मोठ्या प्रमाणात लागवड केली आहे. गावरान आंबाही आकाराने लहान असला तरी त्याची गोडी अधिक असल्याने ग्रामीण भागात त्याचीही मोठ्या प्रमाणात लागवड झाली आहे. मात्र सध्याच्या अनियमित हवामानामुळे दोन्ही प्रकारच्या आंबा उत्पादनावर परिणाम होत आहे. जर अशीच परिस्थिती कायम राहिली, तर यंदाच्या हंगामात उत्पादन घटण्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत. कृषी तज्ज्ञांनीही हवामानातील बदल लक्षात घेऊन योग्य फवारणी व संरक्षण उपाययोजना करण्याचे आवाहन केले आहे.

## साकोरेमळा जि.प. शाळेला स्मार्ट टीव्हीची भेट

### डिजिटल शिक्षणाला नवे बळ; विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील साकोरेमळा येथील गुणवत्ता प्रधान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला मुंबई उच्च न्यायालयातील वरिष्ठ वकील रेश्मा देसाई यांच्या पुढाकारातून स्मार्ट टीव्ही प्रदान करण्यात आला. या उपक्रमामुळे शाळेच्या डिजिटल शिक्षणाला नवे बळ मिळाले असून विद्यार्थ्यांसाठी आधुनिक शिक्षणाची दारे खुली झाली आहेत.

शिंगवे परिसरातील ही शाळा गुणवत्तेच्या बाबतीत तालुक्यातच नव्हे, तर पुणे जिल्ह्यातही नावारूपाला आली आहे. विविध शैक्षणिक स्पर्धा, उपक्रम आणि परीक्षांमध्ये येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करून शाळेचा लौकिक वाढवला आहे. विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अधिक प्रभावी आणि आकर्षक शिक्षण मिळावे या उद्देशाने स्मार्ट टीव्हीची देणगी देण्यात आली. स्मार्ट टीव्हीद्वारे ई-लर्निंग, शैक्षणिक व्हिडिओ, प्रात्यक्षिक सादरीकरणे आणि डिजिटल अभ्यासक्रम सादर करता येणार असून त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आकलन क्षमतेत वाढ होणार आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरी भागातील विद्यार्थ्यांप्रमाणे तंत्रस्नेही शिक्षण मिळावे, हा या उपक्रमामागील मुख्य हेतू आहे.

कार्यक्रमप्रसंगी ॲड. ओंकार ढोबळे, पारगावचे माजी उपसरपंच विठ्ठल ढोबळे, अक्षय घारे, अक्षय ढोबळे, गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर ओंकार ढोबळे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमोल वाव्हळ, मुख्याध्यापक बाबाजी गाढवे, नितीन शेजवळ, सुभाष वाव्हळ आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्याध्यापक बाबाजी गाढवे यांनी शाळेच्या गुणवत्तापूर्ण वाटचालीचा आढावा घेत स्थानिक स्तरावर मिळणाऱ्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाच्या शेवटी नितीन शेजवळ यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

या स्मार्ट टीव्हीमुळे विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता अधिक वृद्धिंगत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# रांजणीत संत श्री लखोजी महाराज पुण्यतिथी भक्तिभावात साजरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील रांजणी गावात श्री नरसिंह भक्त संत श्री लखोजी महाराज यांची पुण्यतिथी मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. ग्रामस्थ व पंचक्रोशीतील भाविकांच्या उपस्थितीत दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांनी गावातील नरसिंह मंदिर परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी आठ वाजता संतांच्या प्रतिमा व पादुकांच्या अभिषेकाने झाली. मंत्रोच्चार, हरिनामाचा गजर आणि टाळ-मृदुंगाच्या निनादात अभिषेक विधी पार पडला. त्यानंतर दिवसभर भजन, नामस्मरण आणि पारायणाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. महिला-पुरुष, तरुणाई आणि ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग नोंदविला.

सायंकाळी पाच वाजता ह.भ.प. श्रीकांत महाराज दुराफे (येडगाव) यांचे हरिकीर्तन झाले. कीर्तनातून त्यांनी संत लखोजी महाराजांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या भक्ती, अध्यात्म आणि समाजप्रबोधनाच्या कार्याची महती सांगितली. त्यांच्या ओजस्वी वाणीने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले.

यानंतर सायंकाळी महाआरती उत्साहात पार पडली. आरतीनंतर भाविकांनी पुष्पवृष्टी करून संतांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन केले. कार्यक्रमानंतर सर्वांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. रात्री उशिरापर्यंत नरसिंह मंदिरात हरीजागराचा कार्यक्रम रंगला.

### पिंपळेश्वर मंदिरात महाशिवरात्री उत्सव उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपळवंडी (ता. जुन्नर) :** महाशिवरात्रीनिमित्त श्री पिंपळेश्वर महादेव मंदिर येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. श्री पिंपळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने उत्सव साजरा करण्यात आला.

शनिवारी उत्सवमूर्ती, भगवान शंकर मुकुट व ध्वजांसह साई पालखी मिरवणूक काढण्यात आली. रविवारी लघुरुद्र अभिषेक, स्वरांजली संगीत भजन मंडळ (पिंपरी पेंढार) यांचे भजन तसेच शाहीर मारुती भुजबळ व अशोक भोर यांचा कलगी-तुरा कार्यक्रम झाला. महाआरती जिल्हा परिषद सदस्य मंगेश काकडे व रुपालीताई काकडे यांच्या हस्ते पार पडली.

# आंबेगावच्या पूर्व भागात महाशिवरात्री उत्साहात

### शंभू महादेव मंदिरांत अभिषेक, प्रसाद वाटप

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील पूर्व भागातील लाखणगाव, काठापूर बुद्रूक, लोणी, धामणी, जारकरवाडी, पहाडदरा पठार, शिरदाळे आणि निरगुडसर या गावांमध्ये महाशिवरात्रीचा सण अत्यंत भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. विविध गावांतील शंभू महादेव मंदिरांत पहाटेपासून अभिषेक, रुद्रपाठ व विधिवत पूजा संपन्न झाली.

जारकरवाडी येथील झांजुरणे बाबा तसेच विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात भाविकांच्या उपस्थितीत शंभू महादेवाच्या पिंडीवर दुग्धाभिषेक करण्यात आला. बेलपत्र, बेलफळ, धोत्र्याची फुले व भस्म अर्पण करून पारंपरिक पद्धतीने पूजा करण्यात आली. निरगुडसर येथेही ग्रामस्थांच्या पुढाकारातून भाविकांसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती. दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांना खिचडी, केळी, मसाले दूध आणि राजगिरा चिक्कीचा प्रसाद वाटप करण्यात आला.

लोणी, धामणी, पहाडदरा पठार व शिरदाळे येथील महादेव मंदिरांत अभिषेकासाठी मोठ्या संख्येने भाविकांनी हजेरी लावली. बहुतांश मंदिरांत पहाटेच अभिषेक सोहळा पार पडला. पूजा व आरतीनंतर दिवसभर दर्शनासाठी मंदिरांचे दरवाजे खुले ठेवण्यात आले होते.


संपूर्ण परिसरात दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रम, भजन-कीर्तन आणि नामस्मरणाचे आयोजन करण्यात आले. युवक व महिला मंडळांनी शिस्तबद्ध नियोजन करून भक्तांच्या सोयीसाठी व्यवस्था केली.

यावेळी अनेक भाविकांनी आधुनिक विज्ञान-तंत्रज्ञानाच्या युगातही अध्यात्माचे महत्त्व अधोरेखित केले. विज्ञान आणि अध्यात्म या एकाच नाण्याच्या दोन बाजू असून दोन्हींच्या समन्वयातूनच समाजाचा सर्वांगीण विकास शक्य असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

### ९ हजार क्विंटल कांदा; एकूण उलाढाल ६ कोटी १० लाख रुपये – मिरची, रताळे, भेंडीला चांगला दर

# खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण मार्केटमध्ये कांद्यासह भाजीपाल्याची विक्रमी आवक!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्डमध्ये रविवारी भाजीपाल्याची विक्रमी आवक नोंदवली गेली. विशेषतः कांद्यासह हिरवी मिरची, रताळे, भेंडी, गवार, वाटाणा, ढोबळी मिरची आणि इतर फळभाज्यांची मोठ्या प्रमाणावर आवक झाल्याने बाजारपेठ गजबजून गेली. दिवसभरात बाजारात तब्बल ६ कोटी १० लाख रुपयांची उलाढाल झाली.

या आठवड्यात कांद्याची तब्बल ९ हजार क्विंटल आवक झाली. कांद्याला कमाल १,५०० रुपये प्रतिक्विंटल, तर सरासरी १,००० ते ८०० रुपये दर मिळाला. मागील आठवड्याच्या तुलनेत कांद्याची आवक वाढल्याने बाजारात चैतन्याचे वातावरण होते. बटाट्याची २,५०० क्विंटल आवक होऊन त्याला कमाल १,३०० रुपये दर मिळाला.

हिरव्या मिरचीची २५० क्विंटल आवक झाली असून तिला ७,००० ते ९,००० रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला. गवारला ७,००० ते १०,००० रुपये दर मिळाल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला. भेंडीची ८४ क्विंटल आवक झाली असून तिला २,००० ते ३,५०० रुपये दर मिळाला. रताळ्याची ३८५ क्विंटल आवक होऊन १,५०० ते २,५०० रुपये दर मिळाला. फळभाज्यांच्या विभागात टोमॅटोची ३५० क्विंटल आवक झाली असून ८०० ते १,४०० रुपये दर मिळाला. कोबी (२२५ क्विंटल) ६०० ते १,००० रुपये, फ्लॉवर (१९० क्विंटल) १,००० ते १,६०० रुपये, वांगी (७२ क्विंटल) २,००० ते ३,००० रुपये दराने विक्री झाली. ढोबळी मिरची (१६८ क्विंटल) ३,००० ते ५,००० रुपये, दोडका (५४ क्विंटल) ४,००० ते ५,००० रुपये, कारली (८१ क्विंटल) ३,५०० ते ४,५०० रुपये दराने विकली गेली. वाटाण्याची ३६५ क्विंटल आवक होऊन २,४०० ते २,८०० रुपये दर मिळाला.

पालेभाज्यांमध्ये मेथीच्या २६ हजार ५३६ जुड्या, कोथिंबिरीच्या ४४ हजार ४१० जुड्या, पालकाच्या ४ हजार ४८५ आणि शेपूच्या ४ हजार ७८५ जुड्यांची आवक झाली. मात्र वाढत्या पुरवठ्यामुळे मेथी, कोथिंबीर आणि पालकाचे दर घसरले असून ४०० ते १,२०० रुपयांच्या दरम्यान व्यवहार झाले.

जनावरांच्या बाजारातही मोठी उलाढाल झाली. ४० जर्सी गाईंपैकी ३५ गाईंची १५,००० ते ७०,००० रुपयांत विक्री झाली. ९० बैलांपैकी ६५ बैल १०,००० ते ४०,००० रुपयांत विकले गेले. १२० म्हशींपैकी ९० म्हशींना ३०,००० ते ८०,००० रुपये दर मिळाला. ७ हजारांहून अधिक शेळ्यामेंढ्यांपैकी ६,४०० शेळ्या २,००० ते १५,००० रुपयांत विकल्या गेल्या. भाजीपाल्याची वाढती आवक आणि समाधानकारक दर यामुळे शेतकरी व व्यापाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसून आले.

## सारांश वृत्त

### केरळमधील शिवमंदिरांमध्ये गर्दी

**तिरुवनंतपुरम :** महाशिवरात्री साजरी करण्यासाठी रविवारी केरळमधील शिवमंदिरांमध्ये भाविकांनी गर्दी केली होती, तर प्रमुख मंदिरांमध्ये पहाटेपासूनच मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. भाविकांच्या गर्दीला तोंड देण्यासाठी, प्रमुख मंदिरांमध्ये विस्तृत व्यवस्था करण्यात आली होती. श्रीकंदेश्वरम महादेव मंदिर, चेंकल महेश्वरम शिव पार्वती मंदिर, वडक्कुन्नाथन मंदिर, अलुवा महादेव मंदिर, वैकोम महादेव मंदिर आणि इतर ठिकाणी पहाटेपासूनच मोठ्या रांगा दिसत होत्या.

### २१ लाख भाविकांनी केले संगमात स्नान

**प्रयागराज (उत्तरप्रदेश) :** माघ मेळ्याच्या शेवटच्या स्नानाच्या दिवशी, महाशिवरात्रीनिमित्त, सकाळी १० वाजेपर्यंत २१ लाख भाविकांनी गंगा आणि संगममध्ये पवित्र स्नान केले आहे, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. मेळा प्राधिकरणाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, शनिवारी रात्री उशिरापासून भाविक मेळा परिसरात येऊन स्नान करत आहेत. रविवारी सकाळी १० वाजेपर्यंत २१ लाख भाविकांनी गंगा आणि संगममध्ये स्नान केले आहे, असे अधिकाऱ्याने सांगितले.

### एआय साक्षरता मोहीमेला प्रारंभ

**तिरुवनंतपुरम :** राज्य सामान्य शिक्षण विभागाची तांत्रिक शाखा असलेल्या केरळ इन्फ्रास्ट्रक्चर अँड टेक्नॉलॉजी फॉर एज्युकेशनने प्रौढ लोकसंख्येला लक्ष्य करून एक मोठी कृत्रिम बुद्धिमत्ता साक्षरता मोहीम सुरू केली आहे. 'सर्वम एआय मायाम' (एआय इज एव्हरीव्हेअर) नावाचा हा उपक्रम देशात राबविण्यात येणारा सर्वात मोठा कृत्रिम बुद्धिमत्ता जागरूकता कार्यक्रम मानला जातो, असे अधिकृत सूत्रांनी सांगितले. या उपक्रमांतर्गत, लिटिल काइट्स आयटी क्लबचे विद्यार्थी राज्यातील सार्वजनिक शाळांमधून ६ लाख पालकांना एआय प्रशिक्षण देतील.

### भाजपने केला संसदीय प्रक्रियेचा अवमान केल्याचा आरोप

# राहुल गांधींचे वर्तन अराजकतावादी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्यातील घटनांवरून भारतीय जनता पक्षाने विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर तीव्र टीका केली आहे. त्यांच्या वर्तनाला "अलोकतांत्रिक" आणि "अराजक" ठरवत भाजपने निषेध नोंदवला आहे.

अधिवेशनाचा पहिला टप्पा २८ जानेवारी ते १३ फेब्रुवारीदरम्यान पार पडला, तर दुसरा टप्पा ९ मार्च ते २ एप्रिलदरम्यान होणार आहे. पहिल्या टप्प्यातील घडामोडींवर भाष्य करताना भाजपचे ज्येष्ठ नेते रविशंकर प्रसाद यांनी राहुल गांधींवर परदेशात भारताची प्रतिमा डागाळल्याचा आरोप केला.

पत्रकार परिषदेत बोलताना प्रसाद म्हणाले की, राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस सदस्यांनी केलेले वर्तन लोकशाही प्रक्रिया, संवैधानिक औचित्य आणि संसदीय नियमांचा अनादर करणारे आहे. संसदीय कामकाज ९ मार्चपर्यंत तहकूब करण्यात आले असून, या कालावधीत घडलेल्या घटनांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे, असे त्यांनी नमूद केले. प्रसाद यांनी आरोप केला की राहुल गांधी यांनी लंडन, मलेशिया आणि सिंगापूरमधील विविध व्यासपीठांवर भारतातील लोकशाही कोसळत असल्याचा दावा करत देशाची बदनामी केली. परदेशी भूमीवर भारताच्या लोकशाहीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणे ही चिंताजनक बाब असल्याचे ते म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल असलेल्या तीव्र राजकीय विरोधातूनच हे वक्तव्य होत असल्याचा आरोपही त्यांनी केला. निवडणूक जनादेश हा जनतेकडून ठरतो आणि तो स्वीकारणे ही लोकशाहीची मूलभूत अट आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

जनरल नरवणे यांच्या कथित पुस्तकाच्या संदर्भातही प्रसाद यांनी प्रश्न उपस्थित केला. संबंधित प्रकाशकाने पुस्तक प्रकाशित झालेले नसल्याचे स्पष्ट केल्यानंतर राहुल गांधींना ते कसे मिळाले, याचे स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी त्यांनी केली.

संसदेतील काही घटनांचा उल्लेख करताना प्रसाद म्हणाले की एका शीख सदस्याला 'देशद्रोही' असे संबोधले गेले, लोकसभा अध्यक्षांना अनौपचारिक संबोधन करण्यात आले आणि पंतप्रधानांच्या आसनाभोवती पक्षाच्या महिला सदस्यांनी घेराव घातला. हे सर्व प्रकार संसदीय परंपरांना धरून नसल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय, केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या पत्रकार परिषदेदरम्यान राहुल गांधी मागून येऊन बोलण्याचा आग्रह धरत असल्याचा आरोपही त्यांनी केला. अशा प्रकारचे वर्तन यापूर्वी कधी घडले आहे का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

जर कुणाला अलोकतांत्रिक पद्धतीने वागायचे असेल, तर ते त्यांच्या पक्षापुरते मर्यादित ठेवावे; संसदेत असे वर्तन अस्वीकार्य आहे, असे प्रसाद यांनी स्पष्ट केले. सभागृह तहकूब झाल्यानंतर या प्रकरणाकडे लक्ष देणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

राहुल गांधी यांच्या संपूर्ण वर्तनाचा भाजप निषेध करत असल्याचे सांगताना प्रसाद म्हणाले की त्यांच्या कृतींमध्ये जबाबदारी आणि उत्तरदायित्वाचा अभाव दिसून येतो. संसदीय मर्यादा आणि लोकशाही परंपरांचे पालन होणे आवश्यक असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला.

# मणिपूरमध्ये तिघा दहशतवाद्यांना अटक



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**इम्फाळ :** मणिपूरमधील दोन जिल्ह्यांत सुरक्षा दलांनी वेगवेगळ्या बंदी घातलेल्या संघटनांशी संबंधित दोन महिलांसह तीन दहशतवाद्यांना अटक केली आहे. शनिवारी तेंग्नौपाल आणि इम्फाळ पूर्व जिल्ह्यात ही कारवाई करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

तेंग्नौपाल जिल्ह्यातील सनराईज ग्राउंड परिसरातून बंदी घातलेल्या पीपल्स लिबरेशन आर्मी (पीएलए) या संघटनेच्या दोन महिला कार्यकर्त्यांना ताब्यात घेण्यात आले. अकोइजाम साखेनबी (२३) आणि चोंगथम हेम्बाबी (१७) अशी त्यांची ओळख पटली आहे. या दोघी संघटनेच्या हालचालींमध्ये सक्रिय सहभाग घेत असल्याची प्राथमिक माहिती तपासातून समोर आली आहे. इम्फाळ पूर्व जिल्ह्यातील नापेटपल्ली येथून बंदी घातलेल्या प्रेपाक (प्रो) संघटनेशी संबंधित इंगुडम इंगोचा सिंग (५०) याला अटक करण्यात आली. त्याच्याकडून पाच जिवंत काडतुसे भरलेले .३२ बोअर पिस्तूल जप्त करण्यात आले आहे. शस्त्रसाठा आणि कारवायांबाबत चौकशी सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

दरम्यान, शुक्रवारी चुराचंदपूर जिल्ह्यातील सिजांग कुकी गावाजवळ सुरक्षा दलांनी सुमारे १० किलो वजनाचा आयईडी जप्त केला. बॉम्ब निकामी पथकाने तात्काळ कारवाई करत स्फोटक सुरक्षितपणे निकामी केले. या प्रकरणीही पुढील तपास सुरू आहे.

# मोहम्मद युनूस यांना राष्ट्रपतीपद?

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**ढाका :** ऑगस्ट २०२४ मध्ये तत्कालीन पंतप्रधान शेख हसीना यांचे सरकार कोसळल्यानंतर नोबेल पारितोषिक विजेते मुहम्मद युनूस यांच्याकडे लष्करी पाठिंब्याने बांगलादेशाची सूत्रे सोपवण्यात आली होती. त्यांनी अंतरिम व्यवस्थेत सल्लागार म्हणून काम पाहत प्रशासन स्थिर करण्याची जबाबदारी सांभाळली. आता सार्वत्रिक निवडणुकांनंतर तारिक रहमान १७ फेब्रुवारी रोजी पंतप्रधानपदाची शपथ घेणार असून, युनूस यांच्या भविष्यातील भूमिकेबाबत राजकीय वर्तुळात चर्चा रंगू लागली आहे.

सोशल मीडियावर युनूस यांना महत्त्वाचे संवैधानिक पद, विशेषतः राष्ट्रपतीपद देण्याबाबत अटकळी व्यक्त होत आहेत. मात्र रहमान यांचे निकटवर्तीय हुमायून कबीर यांनी या चर्चांना दुजोरा दिलेला नाही.

माध्यमातील वृत्तानुसार, कबीर यांनी सांगितले की नव्या सरकारचे प्राधान्य सर्वसमावेशक मंत्रिमंडळ स्थापन करणे हे आहे. खासदारांना त्यांच्या अनुभव आणि कौशल्याच्या आधारे जबाबदाऱ्या देण्यात येतील. सध्या मोहम्मद शहाबुद्दीन हे बांगलादेशाचे राष्ट्रपती आहेत.

दरम्यान, लेखक डेव्हिड बर्गमन यांनी मत व्यक्त केले की युनूस यांना राष्ट्रपती किंवा तत्सम पदावर नेमल्यास देशाला त्यांच्या आंतरराष्ट्रीय प्रतिमेचा फायदा होऊ शकतो. युनूस यांना देशांतर्गत टीकेचा सामना करावा लागतो, तरीही त्यांची जागतिक पातळीवरील विश्वासार्हता मोठी आहे. परराष्ट्र धोरणाच्या दृष्टीने ते पंतप्रधानांसाठी उपयुक्त ठरू शकतात, असे बर्गमन यांनी म्हटले. तथापि, रहमान आणि युनूस यांच्या टीमकडून राष्ट्रपतीपदाबाबतच्या चर्चांना नकार देण्यात आला आहे.

# बीएनपी सरकारचा शपथविधी १७ फेब्रुवारीला

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**ढाका :** बांगलादेशातील सार्वत्रिक निवडणुकीत बीएनपीला मिळालेल्या प्रचंड बहुमतानंतर नवे सरकार १७ फेब्रुवारी रोजी शपथ घेणार आहे. बीएनपी प्रमुख तारिक रहमान पंतप्रधान म्हणून पदाची शपथ घेतील. यावेळी पंतप्रधानांसह संपूर्ण मंत्रिमंडळाचा शपथविधी राष्ट्रीय संसद संकुलाच्या दक्षिण प्लाझा येथे आहे.

स्थानिक वृत्तांनुसार, समारंभानंतर मुख्य निवडणूक आयुक्त ए. एम. एम. नासिर उद्दीन नवनिर्वाचित खासदारांना पदाची शपथ देतील. संविधानानुसार ही जबाबदारी सभापती शिरीन शर्मिन चौधरी यांची असते. मात्र सध्याच्या राजकीय परिस्थितीमुळे प्रक्रियेत काही बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या सोहळ्यासाठी भारत आणि पाकिस्तानसह १३ देशांना निमंत्रणे पाठवण्यात आली आहेत. चीन, सौदी अरेबिया, तुर्की, संयुक्त अरब अमिरात, कतार, मलेशिया, ब्रुनेई, श्रीलंका, नेपाळ, मालदीव आणि भूतान या देशांचा त्यात समावेश आहे. भारताला निमंत्रण देण्यात आले असले तरी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना १७ फेब्रुवारी रोजी फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्यासोबत पूर्वनियोजित बैठक असल्याने, भारताकडून प्रतिनिधी पाठवला जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

तारिक रहमान यांच्या विजयाबद्दल अभिनंदन करणाऱ्यांमध्ये नरेंद्र मोदी हे पहिले नेते होते. बीएनपीने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात भारतासोबत परस्पर आदर, प्रादेशिक शांतता आणि स्थैर्य यांवर आधारित संबंध अधिक बळकट करण्याची भूमिका स्पष्ट केली आहे.

शपथविधी प्रक्रियेदरम्यान काही संवैधानिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. मागील संसदेच्या सभापतींनी राजीनामा दिला असून त्या अज्ञात ठिकाणी असल्याचे सांगितले जाते, तर उपसभापती सध्या तुरुंगात आहेत. अशा परिस्थितीत संविधानातील तरतुदीनुसार राष्ट्रपती दुसऱ्या व्यक्तीकडून शपथविधीची जबाबदारी सोपवू शकतात.

# टिपू सुलतानवरून राजकीय वातावरण तापले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**हैदराबाद :** अठराव्या शतकातील म्हैसूरचा शासक टिपू सुलतान याच्यावरील विधानांमुळे देशातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापले आहे. एआयएमआयएमचे प्रमुख ओवेसी यांनी एका सभेत टिपू सुलतान याला शहीद असे संबोधत त्यांचा वारसा समर्थनीय असल्याचे म्हटले. त्यावर भाजपने तीव्र आक्षेप घेत इतिहासाचे विकृतीकरण केल्याचा आरोप केला आहे.

हैदराबादमध्ये आयोजित कार्यक्रमात बोलताना ओवेसी यांनी टिपू सुलतान इंग्रजांविरुद्ध लढताना मृत्युमुखी पडला, असे सांगितले. त्यानी तुलना करताना स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा उल्लेख केला आणि ब्रिटिशांविरुद्धच्या भूमिकेवर भाष्य केले. तसेच माजी राष्ट्रपती डॉ. अब्दूल कलाम यांच्या आत्मचरित्रात टिपू सुलतानच्या रॉकेट तंत्रज्ञानाचा उल्लेख असल्याचे त्यांनी नमूद केले.


ओवेसींच्या या वक्तव्यावर तेलंगणा भाजपकडून तीव्र प्रतिक्रिया देण्यात आली. भाजपच्या प्रदेशाध्यक्षांनी म्हटले की, कर्नाटक आणि म्हैसूर परिसरात हिंदूंवरील अत्याचारांसाठी टिपू सुलतान जबाबदार होते. त्यांच्या कारकीर्दीत जबरदस्ती धर्मांतर आणि मंदिरे उद्ध्वस्त केल्याच्या घटना घडल्या, असा आरोप त्यांनी केला. टिपूंचे गौरवगान म्हणजे इतिहासाचे चुकीचे सादरीकरण असल्याचेही भाजपने म्हटले आहे.

महाराष्ट्रातही या विषयावरून वाद वाढला आहे. प्रदेश काँग्रेस अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतान याची तुलना छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी केल्याने वातावरण ढवळून निघाले. पुण्यात त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून भाजपने तीव्र निषेध व्यक्त केला आहे. मालेगाव येथे उपमहापौर कार्यालयात लावण्यात आलेल्या टिपू सुलतान यांच्या छायाचित्रावरूनही स्थानिक पातळीवर वाद निर्माण झाला आहे.

### उत्तराखंड उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

# लग्नाचे वचन न पाळणे हा बलात्कार नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**डेहराडून :** दोन प्रौढांमधील दीर्घकालीन संमतीने असलेले संबंध केवळ विवाहात परिणत झाले नाहीत म्हणून त्यांना बलात्कार म्हणून गणले जाऊ शकत नाही, असे स्पष्ट करत उत्तराखंड उच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. विवाहाचे वचन पूर्ण न झाल्याने भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६ अंतर्गत गुन्हा ठरत नाही, जोपर्यंत सुरुवातीपासूनच फसवणुकीचा हेतू होता, हे सिद्ध होत नाही, असे न्यायालयाने नमूद केले.

मसुरी येथील एका महिलेने दाखल केलेल्या गुन्हेप्रकरणात आरोपपत्र आणि कार्यवाही रद्द करण्यासाठी सूरज बोरा यांनी याचिका दाखल केली होती. तक्रारदार महिलेने ४५ दिवसांत विवाह करण्याचे आश्वासन देऊन आरोपीने शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याचा आरोप केला होता.

देहराडून येथील मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर प्रलंबित असलेली कार्यवाही रद्द करताना न्यायमूर्ती आशिष नैथानी यांनी निरीक्षण नोंदवले की, प्रौढ महिलेने दिलेली संमती केवळ संबंध तुटल्याने आपोआप अवैध ठरत नाही. कलम ३७६ अंतर्गत गुन्हा सिद्ध करण्यासाठी हे दाखवणे आवश्यक आहे की विवाहाचे वचन हे केवळ संमती मिळविण्याचे साधन होते आणि आरोपीचा सुरुवातीपासून विवाह करण्याचा कोणताही हेतू नव्हता.

बचाव पक्षाने युक्तिवाद केला की दोन्ही पक्ष दीर्घकाळ संमतीने नातेसंबंधात होते. प्रथम माहिती अहवालात संबंधाच्या प्रारंभी फसवणुकीचा कोणताही ठोस पुरावा नसल्याचे त्यांनी नमूद केले. हे प्रकरण गुन्हेगारी स्वरूपाचे नसून अपयशी नातेसंबंधाचे असल्याचा दावा करण्यात आला.

राज्य सरकार आणि तक्रारदाराच्या वकिलांनी याचिकेला विरोध करत आरोपीचा हेतू खटल्यादरम्यानच स्पष्ट होऊ शकतो, असा युक्तिवाद केला. मात्र न्यायालयाने दीर्घकाळ वारंवार शारीरिक जवळीक साधली गेली असल्याचे स्वरूप सुरुवातीच्या फसवणुकीऐवजी संमतीने असलेल्या संबंधाकडे निर्देश करते, असे म्हटले.

कायदेशीर आधार नसताना फौजदारी कारवाई सुरू ठेवणे म्हणजे आरोपीचा छळ ठरेल, असे नमूद करत न्यायालयाने २२ जुलै २०२३ रोजीचे आरोपपत्र आणि त्यानंतरची सर्व कार्यवाही रद्द केली.

या निर्णयाचे स्वागत करत देहराडूनचे वरिष्ठ वकील संजय चावला यांनी अलीकडे अपयशी नातेसंबंधांनंतर बलात्काराच्या गुन्ह्यांची नोंद वाढत असल्याचे निरीक्षण मांडले. बदलत्या सामाजिक परिस्थितीत प्रौढ व्यक्तींना खरे वचन आणि जबरदस्ती यातील फरक ओळखता येतो, असे त्यांनी म्हटले.

# हजारीबागमध्ये हत्तींचा कहर; ६ जणांचा मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**हजारीबाग :** झारखंडमधील हजारीबाग जिल्ह्यातील चर्चू प्रखंडातील गोंडवार गावात गुरुवारी मध्यरात्री हत्तींचा कळप घुसल्याने सहा जणांचा मृत्यू झाला. अंगो पोलिस ठाण्याच्या हद्दीत, रामगड-हजारीबाग सीमेजवळ ही घटना घडली.

अधिकृत माहितीनुसार, पाच हत्तींचा कळप यापूर्वी बोकारो जिल्ह्यात होता. रात्री सुमारे बारा ते एकच्या दरम्यान तो रामगडकडे सरकत सीमावर्ती गावात शिरला. बोकारोमध्ये अलीकडे घडलेल्या घटनांमध्ये हाच कळप सहभागी असावा, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

वन विभागाने दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, कळपाने गावात प्रवेश करून भात साठवलेल्या घरावर हल्ला केला. गोंधळात काही रहिवासी घराबाहेर आले आणि त्यांना थेट हत्तींचा सामना करावा लागला. या घटनेत सुमन कुमारी (२६), धनेश्वर राम (५२), सूरज राम (५०), सविता देवी (२५), अनुराग राम (१) आणि संजना कुमारी (३) यांचा मृत्यू झाला.

ताज्या घटनेसह बोकारो आणि हजारीबाग जिल्ह्यांत गेल्या दहा दिवसांत या कळपाशी संबंधित मृतांची संख्या ११ वर पोहोचली आहे. ५ फेब्रुवारी रोजी बोकारोतील बर्किपुनू गावात एकाच कुटुंबातील तीन वृद्धांचा पायदळी तुडवून मृत्यू झाला होता. त्यानंतर ७ फेब्रुवारी रोजी गंगपूर गावात दुसऱ्या कुटुंबातील दोन सदस्यांचा बळी गेला होता.

वन अधिकाऱ्यांनी सांगितले की, कळपाला पुन्हा जंगलाच्या दिशेने वळवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. परिसरात वन पथके तैनात असून ध्वनिवर्धकाद्वारे नागरिकांना रात्री घराबाहेर पडू नये, असे आवाहन करण्यात येत आहे. बांकुरा येथील एक पथक सध्या रामगड येथे तैनात असून कळपाच्या हालचालींवर लक्ष ठेवले जात आहे.

हत्तींच्या आक्रमक वर्तनामागील कारणांबाबत अद्याप निश्चित निष्कर्ष काढता आलेला नाही. काही तज्ज्ञांच्या मते, कळप प्रजननाच्या कालावधीत असू शकतो आणि त्या काळात आक्रमकता वाढण्याची शक्यता असते. मात्र याबाबत अधिकृत पुष्टी झालेली नाही. घटनेची कारणे शोधण्यासाठी स्वतंत्र तपास पथक तयार करण्यात येत आहे, असे वनविभागाने म्हटले आहे.

### जीप दरीत कोसळून ३ जणांचा मृत्यू

**मंडी (हिमाचल प्रदेश) :** येथे प्रवास करणाऱ्या एका पिक-अप जीपला १०० मीटरच्या गाड्यात अडकवण्यात आल्याने तीन जणांना आपला जीव गमवावा लागला आणि एक गंभीर जखमी झाला, असे पोलिसांनी रविवारी सांगितले. ही जीप सिलीबागीहून लंबाथाचला जात असताना पहाटे ४ वाजता मंडी जिल्ह्यातील सेराज विधानसभा मतदारसंघातील बदामोडजवळ अपघात झाला. हार्दिक ठाकूर, इशान ठाकूर आणि सुनील कुमार अशी मृतांची ओळख पटली आहे.

# पुद्दुचेरी, लक्षद्वीपमध्ये मतदारसंख्येत घट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पुद्दुचेरी आणि लक्षद्वीपमध्ये राबविण्यात आलेल्या मतदार यादीच्या विशेष सघन सुधारणा प्रक्रियेअंती अंतिम यादी प्रसिद्ध करण्यात आली असून, मतदारसंख्येत अनुक्रमे ७.५ टक्के आणि ०.३५ टक्के घट झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

पुद्दुचेरी येथे अंतिम मतदार यादीत एकूण ९.४४ लाख मतदार नोंदवले गेले आहेत. त्यापैकी ४.४३ लाख पुरुष, ५ लाख महिला आणि १३९ तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे. विशेष सघन सुधारणा प्रक्रिया २७ ऑक्टोबर रोजी सुरू झाली तेव्हा मतदारसंख्या १०.२१ लाख होती. डिसेंबरमध्ये प्रसिद्ध झालेल्या मसुदा यादीत ही संख्या ९.१८ लाखांवर आली होती. मसुदा यादीवर दावे आणि आक्षेप नोंदविण्यासाठी एक महिन्याची मुदत देण्यात आली होती. या कालावधीत ४२,७१९ पात्र मतदारांची नावे नव्याने समाविष्ट करण्यात आली, तर १६,६१९ अपात्र नावे वगळण्यात आली. लक्षद्वीप येथे अंतिम यादीत ५७,६०७ मतदारांची नोंद आहे. एसआयआर प्रक्रियेपूर्वी ही संख्या ५७,८१३ इतकी होती. त्यामुळे येथे ०.३५ टक्के घट दिसून आली आहे.

देशातील उर्वरित दहा राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्येही विशेष सघन सुधारणा प्रक्रिया सुरू असून, त्यांच्या अंतिम मतदार याद्या पुढील काही आठवड्यांत प्रसिद्ध होणार असल्याचे निवडणूक यंत्रणेकडून सांगण्यात आले आहे.

### म्युनिकमध्ये परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांचे स्पष्टीकरण

# भारत-अमेरिका व्यापार करारात रशियन तेलावरून वाद

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली :** भारत आणि अमेरिका यांच्यातील अलीकडील व्यापार करारानंतर रशियन तेल खरेदीच्या मुद्द्यावरून राजकीय वाद तीव्र झाला आहे. विरोधकांनी केंद्र सरकारवर अमेरिकेच्या दबावाखाली निर्णय घेतल्याचा आरोप केला असताना, परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी म्युनिक सुरक्षा परिषदेत भारताची भूमिका स्पष्ट केली.

जर्मनीतील म्युनिक सुरक्षा परिषद येथे झालेल्या चर्चासत्रात डॉ. जयशंकर यांना भारताच्या रशियन तेल खरेदीबाबत थेट प्रश्न विचारण्यात आला. भारताने सुरुवातीला धोरणात्मक स्वायत्ततेच्या नावाखाली रशियन तेल खरेदी सुरू ठेवली आणि नंतर अमेरिकेच्या इशाऱ्यानंतर ती थांबवली का, असा सवाल उपस्थित करण्यात आला होता. यावर उत्तर देताना जयशंकर म्हणाले की रशियन तेल किती खरेदी करायचे, केव्हा करायचे किंवा करायचे की नाही, हे सर्व बाजारातील परिस्थितीवर अवलंबून असते. या निर्णयांमध्ये तेल कंपन्यांची प्रमुख भूमिका असते. भारत, युरोप तसेच इतर देशांतील कंपन्या किंमती आणि उपलब्धता पाहून व्यवहार करतात, असे त्यांनी स्पष्ट केले.

भारताला आपल्या राष्ट्रीय प्राधान्यांनुसार निर्णय घेण्याचा पूर्ण अधिकार असल्याचेही त्यांनी नमूद केले. ऊर्जा सुरक्षेसाठी आणि आर्थिक स्थैर्यासाठी आवश्यक ते निर्णय सरकार घेते, असे सांगत त्यांनी धोरणात्मक स्वायत्ततेचा पुनरुच्चार केला.

दरम्यान, अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताने रशियन तेल खरेदी कमी केल्याचा दावा केला आहे. व्यापार करारानंतर भारतावर लादण्यात आलेल्या अतिरिक्त शुल्कात कपात करण्यात आल्याचेही त्यांनी जाहीर केले. पूर्वी ५० टक्के असलेले शुल्क १८ टक्क्यांवर आणण्यात आल्याचे सांगितले जात आहे. मात्र भारतीय अधिकाऱ्यांनी चर्चेची प्रक्रिया अद्याप सुरू असल्याचे स्पष्ट केले आहे. अमेरिकेकडून रशियाला पर्याय म्हणून व्हेनेझुएलाकडून तेल खरेदी करण्याचा पर्याय सुचविण्यात आल्याची माहितीही समोर आली आहे. तथापि, याबाबत भारत सरकारकडून औपचारिक भूमिका जाहीर करण्यात आलेली नाही.

या पार्श्वभूमीवर रशियानेही प्रतिक्रिया दिली आहे. क्रेमलिनचे प्रवक्ते दिमित्री पेस्कोव्ह यांनी म्हटले आहे की भारत कोणत्याही देशाकडून तेल खरेदी करण्यास स्वतंत्र आहे. रशिया हा भारताचा एकमेव पुरवठादार नाही आणि कधीच नव्हता, असे त्यांनी स्पष्ट केले. भारताने कच्च्या तेलाच्या स्रोतांमध्ये विविधता आणणे ही नवी बाब नाही, असेही त्यांनी नमूद केले.

रशिया-युक्रेन युद्धानंतर भारताने रशियन तेल खरेदी वाढवली होती. त्या काळात रशियाकडून सवलतीच्या दरात तेल पुरवठा होत होता. मात्र कालांतराने सवलतीत घट झाली आणि आंतरराष्ट्रीय बाजारातील बदलत्या परिस्थितीनुसार भारताने खरेदीचे प्रमाण समायोजित केले.

संपूर्ण प्रकरणात भारताने बाजाराधारित निर्णयप्रक्रिया आणि राष्ट्रीय हित यांवर भर दिल्याचे स्पष्ट होत आहे. राजकीय आरोप-प्रत्यारोपांच्या पार्श्वभूमीवर ऊर्जा सुरक्षेचा प्रश्न आणि जागतिक सामरिक समीकरणे या दोन्हींचा तोल राखण्याचे आव्हान केंद्र सरकारसमोर कायम आहे.